दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

■(आष्टी) वर्धा ■बुधवार, दि.१७ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■अंक १९१ ■पृष्ठ ६ ■मुल्य ५.०० ■मुख्यसंपादक : राहुल गजरे ■कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

कर्जबाजारी पणा मुळे शेतकऱ्याची आत्महत्या



सेलू :तालुक्यातील महाबळा येथे आपल्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज ता. १६ मंगळवार रोजी घडली. मारोती लक्ष्मणराव उमाटे वय वर्ष ५८ असे गळफास घेतलेल्या इसमाने नाव असून मिळालेल्या प्राप्त माहिती नुसार मारोती उमाटे हे नेहमी प्रमाणे साडे सहा वाजता शेतात गेले ,सदर इसम महाबळा येथील रहिवासी असून त्यांच्या कडे ५ एकर शेती होती .शेतीच्या लागवडी करिता त्यांनी ब्यांकेचे कर्ज घेतले होते ,परंतु अपेक्षित उत्पन्न न झाल्यामुळे कर्ज कसे फेडावे या विवंचनेत त्यांनी स्वतःच्या शेतात गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. सदर घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ता रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांना मिळताच त्यांनी रुग्ण वाहिकेत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सेलूच्या ग्रामीण रुग्णालयात पाठविला. पुढील तपास सेलू पोलीस स्टेशन चे अधिकारी करीत असून मारोती उमाटे यांच्या मागे दोन मुले व पत्नी असा आप्त परिवार आहे.

कुस्तीपटू पै स्व खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिना निमीत्य विविध स्पर्धे आयोजन करावे :खासदार रामदास तडस

वर्धा ■ प्रतिनिधी

जिल्हा क्रिडा संकुल वर्धा येथे क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय वर्धा व्दारा विविध स्पर्धाचे आयोजन



वर्धाः आमचे सर्वांचे प्रेरणास्थान, ऑलिंपिकमध्ये वैयक्तिक पदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू महान कुस्तीपटू पै स्व खाशाबा जाधव यांचा जन्मदिन हा दरवर्षी राज्याचा क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला, आज राज्य क्रीडा दिनानिमीत्य आयोजीत स्पर्धेमध्ये आपण सर्व खेळाडुंनी सहभाग घेऊन ख-या अर्थाने त्यांना श्रध्दाजंली दिली आहे. याच प्रमाणे दरवर्षी राज्य क्रीडा दिनानिमीत्य विविध खेळांचा समावेश करुन स्पर्धेचे आयोजीत करुन वर्धा जिल्हयातील खेळाडुंना एक व्यासपीठ उपलब्ध करुन द्यावे असे यावेळी खासदार रामदास तडस म्हणाले.

महान कुस्तीपटू स्व.खाशाबा जाधव यांची जयंती व राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रिडा संकुल वर्धा येथे क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय वर्धा व्दारा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले, स्पर्धेच बक्षिस वितरण सोहळा खासदार रामदास तडस साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आला, यामध्ये विजयी व उपविजयी खेळाडू व संघांना स्मृतिचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. सदर कार्यक्रमाकरिता शिवछत्रपती पुरस्कारार्थी किशोर पोफळी प्राध्यापक डॉ प्रकाश चोपडे, कुस्ती खेळाचे जेष्ठ खेळाडू मदनसिंग चावरे, गिरीष उपाध्याय, क्रीडा अधिकारी अनिल निमगडे प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती आशा मेश्राम ह्या न्यायालयीन कामकाजाकरिता नागपूर येथे गेल्याने त्यांनी सदर कार्यक्रमाकरिता शुभेच्छा व मार्गदर्शन केले.

खाशाबा जाधव राज्य क्रीडा दिवस स्पर्धा मध्ये कुस्ती, व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल या खेळांचे आयोजन करण्यात आलेले होते, यामध्ये कुस्तीमध्ये मुले ५१ कि वजन गटात प्रथम पुरस्कार शिवम जाधव, व्दितीय पुरस्कार पियुश शेटे, ६१ कि वजन गटात प्रथम पुरस्कार वेदांत चव्हाण, व्दितीय पुरस्कार भुषन आगलावे, ६५ कि वजन गटात प्रथम पुरस्कार शंकेश पाटील, व्दितीय पुरस्कार समीर वाढई, ८२ कि वजन गटात प्रथम पुरस्कार अंश श्रीवास, व्दितीय पुरस्कार प्रज्वल वाटकर, ८६ कि वजन गटात प्रथम पुरस्कार नवनाथ भुसनार, व्दितीय पुरस्कार अजय बिलारे, ९२ कि वजन गटात प्रथम पुरस्कार सम्राट कांबळे व्दितीय पुरस्कार आशिष लोहांडे, ९२ ते १२० कि वजन गटात प्रथम पुरस्कार श्रृषीकेश बोधाने व्दितीय पुरस्कार प्रज्वल बावने, मुलीमध्ये खुला गट प्रथम पुरस्कार गायत्री वडतकर, व्दितीय पुरस्कार शालीनी मोरे, ५३ किलो वजन गटात प्रथम पुरस्कार कोमल सलामे, व्दितीय पुरस्कार अनुष्का सोमलवार यांनी पुरस्कार प्राप्त झाला.

व्हालीबॉल स्पर्धेमध्ये मुली प्रथम पुरस्कार डिसीसी वर्धा, व्दितीय पुरस्कार युवा एकता क्रीडा मंडळ वर्धा, मुलामध्ये प्रथम पुरस्कार डिसीसी वर्धा व्दितीय पुरस्कार साई स्पोर्टस वर्धा, हॅन्डबॉल स्पर्धेमध्ये मुली प्रथम पुरस्कार अग्रगामी स्कुल म्हसाळा व्दितीय पुरस्कार वर्धा क्लब वर्धा, मुलामध्ये प्रथम पुरस्कार जेबी बॉईज व्दितीय पुरस्कार वर्धा क्लब वर्धा प्राप्त झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नितीन घोडे तर आभार प्रदर्शन श्री अनिल निमगडे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता बॅडमिंटनचे नितीन जाधव, मनोज झाडे, प्रतीक बोधे, यश, ओम तिवारी, रामटेके जिल्हा क्रीडा संकुलाचे व्यवस्थापक रवी काकडे, अशोक पेढेकर , जयंत गोडघाटे, नाना टेकाम यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठया संख्येने विविध स्पर्धेकरिता आलेले खेळाडु उपस्थित होते.

आजपासून दोन दिवसीय मूळव्याध लेसर उपचार शिबीर

म. गां. आयुर्वेद रुग्णालयाचे आयोजन

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा - दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठ संचालित सालोड (हिरापूर) येथील महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालयात दि. १७ व १८ रोजी मूळव्याध, भगंदर व फिशर या व्याधींची तपासणी, निदान आणि आधुनिक लेसर उपचार व क्षारसूत्र पद्धतीने शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शल्यचिकित्सा बाह्यरुग्ण तपासणी विभागात आयोजित या आरोग्य शिबिरात पोट स्वच्छ न होणे, शौचातून रक्तस्त्राव होणे, शौचाच्या वेळी वेदना होणे, अशी लक्षणे असलेल्या स्त्री व पुरुष रुग्णांची तपासणी केली जाईल. शिबिरात शल्यतंत्र विभाग प्रमुख डॉ. शीतल आसुटकर, डॉ. देवयानी दासार, डॉ. समता सेमस्कर, डॉ. पूजा श्रीवास्तव व डॉ. धनंजय शेटे हे तज्ज्ञ रुग्णतपासणी व उपचार करणार असून मूळव्याध तसेच हर्निया, हायड्रोसिल व सामान्य शस्त्रक्रियाही नाममात्र शुल्कात करण्यात येणार आहे. शिबीर सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित असून गरजू रुग्णांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अभ्युदय मेघे, आयुर्वेद महाविद्यालयाच्या अधिष्ठाता व मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली कुचेवार, समन्वयक व्ही. आर. मेघे यांनी केले आहे.

विकसीत भारत संकल्प यात्रा वर्धा शहरात मान्यवरांच्या हस्ते दिली हिरवी झेंडी



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धाः भारताचे लोकप्रीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र शासनाच्या विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून विकसीत भारत संकल्प यात्रा हा महत्वाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरी आणि ग्रामीण भागात १७ महत्वाच्या योजनांची माहिती या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. ज्यांना आतापर्यंत कोणत्याच योजनांचा लाभ मिळाला नाही, अशा नागरिकांपर्यंत पोहचण्याचा हा प्रयत्न आहे. सदर योजनेत काय काय लाभ मिळू शकतात, कोण लाभार्थी होऊ शकतात, यासदंर्भात एकत्रित माहिती देण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी विकसित भारत संकल्प रथाला भेट देण्याचे आवाहन खासदार रामदास तडस यांनी यावेळी केले.

नगर परिषद वर्धा कार्यालय मध्ये आज दिनांक १५/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ''विकसीत भारत संकल्प यात्रेला'' हिरवी झेंडी देऊन नागरी भागासाठी संकल्प यात्रेचे मान्यवरच्या शुभ हस्ते उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी मा. खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले (भा.प्र.से), मा. जिल्हा सह आयुक्त हर्षल गायकवाड, मुख्याधिकारी तथा प्रशासक न.प. वर्धा राजेश भगत तथा नगर परिषद सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच नगर परिषद क्षेत्रातील अठरा योजनाचे लाभार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.सदर विकसीत भारत संकल्प यात्रा रथ शहरात विविध ठिकाणी भेट देऊन केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजनाची माहिती देणार आहे.

पोलिस अधिकाऱ्यांकडून आधारकार्ड शिबिराचे उद्घाटन



कामठी ■ नंदू कोल्हे

कामठी -: जमात-ए-इस्लामी हिंदच्या नेतृत्वाखाली दरोगा मस्जिद, गुजरी बाजार रोड येथे आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, बुधवारी लोकांचे आधार कार्ड बनविण्यात आले. या दरम्यान शिबिराचे उद्घाटन जुना कामठी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक भिताड़े व नवीन कामठी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद पोरे यांच्या हस्ते रिबन कापून संयुक्तपणे आधार कार्ड शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. ज्यांना सन्मानित केले. ते म्हणाले की, शासन प्रत्येक व्यक्तीला सुविधा देत आहे. त्याचा लाभ घ्यावा. यावेळी डॉ. मोहम्मद यासीन कुद्दुसी, मौलाना सिराज अहमद, अनवर-उल-हक पटेल, डॉ. कमाल अहमद, वकील इद्रिस, मजहर इमाम, डॉ. तलत अन्सारी, सलीम अहमद, नसीम अहमद, असलम अकबानी, शहजाद पटेल, मोईनुल हसन, गरीबुल्ला, अहफाज अहमद कॉन्ट्रॅक्टर, अल्ताफ अहमद कुरेशी, शीतल बरबटे आदी प्रमुख उपस्थित होते.

आयएसएमपीचे ७वे अधिवेशन 'कीर्तीमान' संपन्न

पत्रकार, लेखक, शिक्षक, समाजसेवक यांचा सन्मान;विविध विषयांवर विचार मंथन

वर्धा ■ प्रतिनिधी



इंटलेक्चुअल सोसायटी ऑफ मीडिया प्रमोटर्स (आयएसएमपी) चे 'कीर्तीमान' हे सातवे वार्षिक अधिवेशन १० जानेवारी रोजी सांगली येथे पत्रकार, लेखक, शिक्षक व समाजसेवक यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या अधिवेशनात पत्रकार, लेखक, शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेस विरासत पुरस्कार, स्वतंत्र, निष्पक्ष, निर्भय पत्रकारिता पुरस्कार आणि समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. उद्घाटन सत्रात डॉ. शाहिद अली, रायपूर यांनी पत्रकारितेतील युवा लेखकांची भूमिका, वर्धेचे एड. नीळकंठ हूड यांनी

सार्वजनिक हित आणि निखळ मनोरंजनासाठी सोशल मीडियाची जबाबदारी या विषयावर तर वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश ?वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी, बी. एस. मिरगे यांनी अहिंदी भाषिक लोकांमध्ये हिंदीबद्दलची आवड कशी वाढवता येईल या विषयावर विचार मांडले.?

लुप्तप्राय हिंदी साहित्यातील हस्तलिखितांचे जतन या विषयावर सांगलीच्या मानसशास्त्रज्ञ व समाजसेविका अर्चना दादासाहेब मुळे यांनी तर संशोधनातील विषयाचे विश्लेषण या विषयावर राजीव गांधी विवि, दोईमुखचे सहायक प्रो. डॉ. राजीव रंजन प्रसाद यांनी विचार मांडले. बदलत्या काळात नागरिक पत्रकारितेचे महत्त्व या विषयावर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील डॉ. संजय पाईकराव यांनी, प्रसार माध्यमातील रोजगार संधी या विषयावर लखनौचे देवेंद्र प्रजापती यांनी, पर्यावरण जागृतीवर तहसीलदार असगर अली आणि स्वयंसेवी विकास या विषयावर रवींद्र इनामदार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी 'नाट्य कला' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. सांगली येथील शांतीनिकेतन लोकविश ?वविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात नवभारत शिक्षण मंडळ शांतीनिकेतन लोक विद्यापीठाचे अध्यक्ष गौतम पाटील यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाची सुरुवात ऑगस्ट क्रांती स्मारकाला अभिवादन करून आणि भाषण स्वातंत्र्याची शपथ घेऊन झाली. आयएसएमपी या संस्थेचा परिचय महाराष्ट्र आयएसएमपीचे अध्यक्ष व वर्धा जिल्हा मानद वन्यजीव संरक्षक कौशल मिश्रा यांनी करून दिला. आयएसएमपीचे संस्थापक आणि अध्यक्ष चंद्रशेखर, लखनौ यांनी अधिवेशनाची संकल्पना मांडली. अधिवेशनात वर्धा येथून कौशल मिश्र, एड. नीलकंठ हुड, सेवा निवृत्त मेडिकल ऑफिसर डॉ. वसीम कुरेशी, एड. ताम्रध्वज बोरकर, नीलिमा मुणोत, नीलिमा निखार, यशवन्त भांडेकर, निवृत्त वन अधिकारी सुधीर बावनकर, राजकुमार पांडे, प्रगती मिरगे, पत्रकार अमिता शिंदे, अन्वेश, उज्ज्वला भांडेकर, गीता मिश्रा, करुणा भिसे कुरेशी, रंजना हूड, संभाजीनगर येथील संपादक नारायणपुरकर वाय. के. व डॉ. संजय पाईकराव, मुंबई येथील भोजपुरी फिल्म निर्माते लालजी गुप्ता, मुंबईच?या वरिष्ठ लेखिका, कवियत्री कांचन प्रकाश संगीत, देवेन्द्र प्रजापति (लखनऊ), कोल्हापूर येथील एन एन क़ाज़ी, साताराचे विजय देशपांडे, अनुबोध मासिकाचे संपादक मिलिंद प्रधान, लेखिका डॉ. पूजा हेमकुमार अलापुरिया, सांगली यांच्या सह मान्यवर पाहुणे, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी ११ जानेवारी रोजी छत्रपती शाहू महाराजांचे जन्मस्थान, संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहासह कोल्हापूरच्या ऐतिहासिक व वारसा स्थळांना भेट देण्यात आली.? कोल्हापूरचे पीटर चौधरी यांनी ऐतिहासिक स्थळांची माहिती दिली. प्रसिद्ध शाहीर पिराजी सरनाईक यांचे नातू अमर सरनाईक यांनी सर्वांचे स्वागत केले. कोल्हापूर येथे स्वातंत्र्यसैनिक निजामुद्दीन क़ाज़ी सद्भावना केंद्राने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सर्वांनी सहभाग घेतला. यंदाचा निजामुद्दीन क़ाज़ी सद्भावना पुरस्कार लोकमत कोल्हापूरचे संपादक वसंत आप्पासाहेब भोसले यांना कोल्हापूरच्या आमदार जयश्री जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आयएसएमपीचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी सर्वांचे आभार मानले.

कामठी तेली समाजाच्या वतीने संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी साजरी

कामठी ■ नंदू कोल्हे



समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी मार्गशीर्ष कृ.१३ दि.०९/जानेवारी २०२४ ला संस्थेच्या वतीने संत जगनाडे महाराज सांस्कृतिक सभागृहाचे जागेवर अतीशय उस्फुर्तपणे पार पडली. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे माजी अध्यक्ष विश्रामजी भनारे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली.याप्रसंगी राजुभाऊ मदनकर, अध्यक्ष परमात्मा एक, मनोज जिभकाटे उपसरपंच भिलगाव, अतुल बावनकुळे उपसरपंच खसाळा, खोजेन्द्र माकडे भिलगाव, होमेश्वर चकोले, गोपाळराव वंजारी,लक्ष्मणराव नाटकर उपस्थित होते.यानंतर भजन कीर्तन मृदंगाच्या तालावर संपूर्ण परिसर भक्तिभावाने निनादला.किर्तन गोपालकाला आरतीने संताजी जगनाडे महाराजांच्या प्रतिमेची पुजा अर्चना करण्यात आली.

यानंतर झालेल्या समाज स्नेह संमेलनाची सुरुवात पाहुण्यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून बाल भगिनींनी गोंधळ नृत्य सादर केले. प्रमुख पाहुणे आमदार मा.टेकचंद सावरकर,सौ.निशाताई सावरकर माजी अध्यक्ष जि.प., जिप सदस्य मोहन माकडे, मा.गंगाधर नाकाडे अध्यक्ष महाराष्ट्र शिक्षक सेना, सौ.करुणाताई आष्टनकर अध्यक्षा न.पं.कन्हान, मा.गुलाबराव सुपारे संस्थामार्गदर्शक, सौ.चित्राताई माकडे, डॉ.दिनेश जिभकाटे, संताजी ब्रिगेड चे अजय धोपटे, माजी जि.प. उपाध्यक्ष मा.शरद डोणेकर, डॉ.शिल्पा भुते स्त्रीरोगतज्ञ, मनीषकारेमोरे, माजी सरपंच, निखिल भुते, गजानन बावनकुळे, शोभाताई वंजारी, डॉ.चांगदेवजुनघरे,प्रा.ज्ञानेश्वर रेवतकर,नत्थुजी रघटाटे, मंचावर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने करण्यात आली. उपस्थित पाहुण्यांचे स्वागत शाल श्रीफळ, सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष राधेश्याम हटवार यांनी केले. संस्थेचे जागेवर रु.७६ लाख निधीचे मंजूर झालेले संताजी जगनाडे महाराज कौशल्य विकास केंद्राचे भुमीपुजन मा.आमदार टेकचंद सावरकर यांच्या हस्ते झाले त्यावेळी उपस्थित समाज बांधवाना मार्गदर्शन करताना सावरकर यांनी या कौशल्य केन्द्रातुन समाजातील उपेक्षित व गरजुंना स्वयंरोजगार व व्यवसायीक प्रशिक्षण देण्यात येइल.या भवनाचे बांधकाम भव्य व्हावे यासाठी निधी कमी पडणार नाही याची ग्वाही दिली. मा.चंद्रशेखर बावनकुळे यांनी या केंद्र भुमीपुजनास कामाचे व्यस्थतेने उपस्थित नझाल्याने बांधकामासशुभेच्छा देत निधीची कमतरता होणार नाही लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल याची माहीती यावेळेस दिली. कार्यक्रमाचेसूत्र संचालन उपाध्यक्षा मंगलाताईकारेमोरे यांनी तर आभारप्रदर्शन संस्थेच्या उपाध्यक्षा सविताताई कुल्लरकर यांनी केले.

या पुण्यतिथीचे निमित्ताने आयुष्य मान भारत हेल्थकेअर कार्ड कॅम्प महालक्ष्मी ऑनलाइन सर्विसेस गायधने परीवाराचे सौजन्याने राबविण्यात आला.व कार्ड पाहुण्यांचे हस्ते वाटपकरण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शंकरराव वाडीभस्मे हरीहर गायधने, सुरेश भनारे, भैय्यालाल माकडे, गोपाळराव वंजारी, प्रभाकर गायधने, रमेश कारेमोरे, ज्ञानेश्वर वंजारी, अरविंद पाहुणे, मुकुंद जिभकाटे, मुकेशचकोले, दिनेशआष्टनकर, संजीव बावनकुळे, प्रल्हाद वंजारी, अतुल गायधने, डॉ.अतुल भुते,रवी हटवार, डॉ.रमेश वाडिभस्मे,योगेश गायधने, देवेंद्र बावनकुळे, रमाकांत श्रावणकर राधेश्याम मानकर आनंद चकोले, सागरमदनकर, राजेश हटवार सावित्रीताई तेलरांधे जयाताई वाडीभस्मे माधुरी वंजारी, गीताताई गायधने, भाग्यश्रीपाहुणे, सुरेखाताईपाहुणे, वनीताताई नाटकर ममताताई भनारे, संगीताताईपोटभरे वर्षाताई बावनकुळे, उषाताईकारेमोरे, शिलाताई देशमुख, सिंधुताई मोरे, कल्पनाताईगायधने, वंदनाताई भस्मे, कविता बावनकर यांनी कार्यक्रम करीता परिश्रम घेतले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाज बांधव व भगीनी उपस्थित होते.

सर्वांच्या सहकार्याने साईबाबा मंदिराचा सर्वांगीण विकास : खासदार कृपाल तुमाने

हजारो भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

कामठी ■ नंदू कोल्हे



कामठी, सर्वांच्या सहकार्यामुळे श्री साईबाबा मंदिर अडापूलचा सर्वांगीण विकास होत असल्याचे मत खासदार कृपाल तुमाने यांनी श्री साईबाबा मंदिर येथे नवीन वर्षाच्या पर्वावर आयोजित महाप्रसाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना व्यक्त केले महाप्रसादाचा हजारो भक्तांनी लाभ घेतला.

श्री साईबाबा मंदिर पंच कमिटीच्या वतीने नवीन वर्षाच्या पर्वावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते मंदिराचे संस्थापक श्रीकृष्ण देवनाथ बाबा यांचे हस्ते पूजा, आरती करून महाप्रसाद कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली महाप्रसादा दरम्यान कपिल देशमुख यांचा साई भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता महाप्रसाद कार्यक्रमाला खासदार कृपाल तुमाने ,आमदार टेकचंद सावरकर ,नागपूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश भोयर, शिवसेनेचे विदर्भ प्रमुख सुरेश माने ,नागपूर जिल्हा उपप्रमुख राधेश्याम हटवार , उद्योगपती पप्पू अग्रवाल, भाजप नागपूर जिल्हा महामंत्री अनिल निधान, कामठीकाँटोनमेंट बोर्डाचे नगरसेवक कमल यादव, माजी उपाध्यक्ष गोपालसिंग यादव ,कामठी शहर भाजप अध्यक्ष चंद्रशेखर तुपट, कपिल गायधने, विजय कोंडुलवार पंकज वर्मा ,अजनी ग्रामपंचायतचे माजी सरपंच प्रभाकरराव देशमुख, वारेगावच्या सरपंच रत?नाबाई उइके, येरखेडा ग्रामपंचायतचे उपसरपंच मंदा महाले पाटील , मनोहर मन्सूरकर, नरेश बर्वे ,उमाशंकर सिंग, गणेश यादव ,दिलीप बडवाईक, रवी कोतपल्लीवार, सुदेश अग्रवाल ,लाला खंडेलवाल, पवन ररुगटा, राजू बुटांनी, गोपाल चव्हाण, जेता फुले, राजेश अग्रवाल ,विजय उरकुडे, अजबराव उईके उपस्थित होते पाहुण्यांचे हस्ते सेवाधारी पंढरीनाथ गिरे, यश साहू, रामेश्वर गोरले ,अशोक भस्मे, लक्ष्मी भस्मे,मेवालाल गुप्ता ,जवाहरलाल मोरया ,विजय लांबाटे ,अनिल नेवारे, लंकेश महनतो, मनोज शिंगणे ,तेजस शिंगणे यांचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदाम राखडे यांनी केले संचालन राजेश खंडेलवाल यांनी केले व आभार प्रदर्शन उमाशंकर सिंग यांनी मांनले कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

संपादकीय...

सौंदर्य आणि सातत्य..

'फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!'.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गार.खेळाडू आणि प्रशिक्षक अशा दोन्ही भूमिकांतून विश्वचषक जिंकण्याची अलौकिक कामगिरी झागालो आणि बेकेनबाउर यांना साधली होती.'फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!'.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गार. ते ज्या 'जिंकणाऱ्या' जर्मनांबद्दल बोलले, त्या जर्मनांमध्ये जिंकण्याची मानसिकता रुजवली फ्रान्झ बेकेनबाउर यांनी. १९६०चा उत्तरार्ध आणि १९७०चे दशक बेकेनबाउर यांच्या जर्मनीने गाजवले. फुटबॉल मेरुमणी ब्राझीलचे पेले अस्ताला गेल्यानंतर आणि योहान क्रायुफ यांच्या नेतृत्वाखाली डच फुटबॉल संघ अफलातून कामगिरी करत असताना, स्वतःचे झळाळते अस्तित्व सादर करत, या मातब्बर मंडळींना काही काळ निस्तेज करण्याची कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली. ब्राझिलियन फुटबॉल रसिकांनी फुटबॉलचे वर्णन 'जोगो बोनितो' असे केले आहे. म्हणजे सुंदर खेळ. फुटबॉलमधील ब्राझीलच्या अढळपदामुळे हेच नाव आणि वर्णन सार्वत्रिक ठरले. सौंदर्यामुळेच खेळाच्या लोकप्रियतेची व्याप्ती पंचखंडात पोहोचली. फुटबॉल म्हणजे कौशल्य आणि ऊर्जा यांचा मेळ. यांत समतोल साधून दिग्विजयी होणे हे फुटबॉल संघांचे लक्ष्य असते. पण हे झाले या खेळाचे सरधोपट आणि स्वप्नाळू वर्णन. निव्वळ कौशल्य आणि ऊर्जेच्या पलीकडे या खेळात सखोल व्यामिश्रता असते. मैदानावर खेळताना त्रिमितीय अवकाशभान असावे लागते. संधी हेरण्याची नजर असावी लागते. धोकादायक प्रतिस्पर्ध्यासमोर पाय रोवून उभे राहण्याचा निर्धार लागतो. कोलाहली प्रेक्षकांसमोर धैर्य शाबूत ठेवण्याची कला लागते. त्याहीपलीकडे जाऊन, विविध व्यक्तिमत्त्वांना समान उद्दिष्ट साधण्यासाठी एकाच धाग्यात गुंफावे लागते. यासाठी ठायी नेतृत्व लागते. निष्णातांहून निष्णात गणल्या गेलेल्या फुटबॉलपटूंमध्ये असे बहुपैलुत्व नव्हते. ते ज्या मोजक्यांत होते, त्यांमध्ये बेकेनबाउर हे नाव पहिल्या तिघांत तरी घ्यावेच लागेल.जर्मन इंजिनीअरिंगची बिनचूक शिस्त आणि इटालियन डिझाइनची नजरखेचक नजाकत अशा मिलाफातून कुणी एखादी मोटार बनवली, तर तिचे नाव 'बेकेनबाउर' असे खुशाल ठेवावे! 'प्रशियन' कण्याच्या उंच चणीचे शरीर, शहामृगासारखी लांब ढांगांची लयबद्ध धाव, गरुडासारखी भिरभिरणारी बहुकोनीय नजर, ग्रीक देवतेसम देखणे व्यक्तिमत्त्व लाभलेले बेकेनबाउर जर्मनांच्या दृष्टीतून सम्राट होते. म्हणूनच 'डेर कायझेर' हा सम्राटासाठीचा जर्मन प्रतिशब्द हीच त्यांची ओळख बनली. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये जर्मनी आणि क्लब फुटबॉलच्या विश्वात बायर्न म्युनिच यांचा दरारा सत्तरच्या दशकात निर्माण झाला आणि पुढे कित्येक वर्षे टिकून राहिला याचे श्रेय बेकेनबाउर यांना द्यावे लागेल. १९६६ च्या विश्वचषकापासूनच बेकेनबाउर हे नाव विश्वचषकाच्या दुनियेत गाजू लागले होते. तत्कालीन पश्चिम जर्मनीचा संघ अंतिम फेरीत यजमान इंग्लंडला भिडला, त्या वेळी वीस वर्षीय हिंमत लागते. बेकेनबाउर यांच्यापाशी ती होती. गोल करण्यासाठी लागणारे कसब असूनही बेकेनबाउर त्या फंदात फारसे पडायचे नाहीत. ती जबाबदारी म्युलर, ब्राइटनर असे त्यांचे सहकारी पार पाडायचे. पण म्हणून बेकेनबाउर यांच्याकडून गोल होणारच नाही याची हमी कुणीही देऊ शकत नव्हते. त्यामुळेच ते अतिशय धोकादायक ठरायचे. १९७२ मध्ये युरो अजिंक्यपद आणि १९७४ मध्ये जगज्जेतेपद जर्मनीने मिळवले. १९७४ ते १९७६ अशी सलग तीन वर्षे बायर्न म्युनिचने युरोपियन क्लब अजिंक्यपद पटकावले. हे सर्व करंडक उंचावणारे बेकेनबाउर पहिले कप्तान होते. फुटबॉलमधील वार्षिक 'बॅलॉं डी ओर' हा प्रतिष्ठेचा वैयक्तिक पुरस्कार दोन वेळा पटकावणारे ते एकमेव बचावपटू.बेकेनबाउर हे आख्यायिका बनले, त्या सुवर्णपटाचा हा झाला पहिला भाग. दुसऱ्या भागाची सुरुवात झाली ऐंशीच्या दशकात. त्या काळात त्यांच्याकडे जर्मन संघाच्या प्रशिक्षकपदाची धुरा सोपवण्यात आली. ते साच्यातले प्रशिक्षक नव्हते. एकदा त्यांच्या खेळाडूंनी रात्रभर पार्टी आणि मद्यमस्ती केली. एकावरही त्यांनी कारवाई करण्याची इच्छादेखील बोलून दाखवली नाही. त्यांचे खेळाडूंना एकच सांगणे असे - मैदानावर जा नि आनंद लुटा. तो काळ जर्मनीसाठी आव्हानात्मक होता. हा संघ अंतिम फेरीत किंवा त्याच्या आसपास जात होता, पण तेथे जिंकत नव्हता. इटली, ब्राझील हे जुने प्रतिस्पर्धी अधिक सक्षम बनले होतेच. याशिवाय अर्जेंटिना, डेन्मार्क आणि मुख्य म्हणजे फ्रान्ससारखे संघ जर्मनीपेक्षा सरस कामगिरी करून दाखवू लागले होते. पण जर्मनीच्या फुटबॉल व्यवस्थेला आणि फुटबॉलपटूंना बेकेनबाउर यांच्याविषयी आदर होता. सत्तरच्या दशकात मैदानावर दाखवलेले नेतृत्व बेकेनबाउर यांनी थोडे फेरफार करून ऐंशीच्या उत्तरार्धात मैदानाबाहेर केले. पहिल्याच प्रयत्नात म्हणजे १९८६ मध्ये त्यांचा संघ अंतिम फेरीत धडकला. तेथे दिएगो मॅराडोनाच्या युवा, चपळ संघासमोर पराभूत झाला. पुढील विश्वचषक स्पर्धेत याच दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये अंतिम सामना झाला. तो जर्मनीने जिंकला. कारण जिंकण्याची मानसिकता तोपर्यंत बेकेनबाउर यांनी जर्मन संघात मुरवली होती. ते स्वच्छंदी होते. एकाच जागी घरोबा करून त्याचा मठ बनवण्याची त्यांची वृत्ती नव्हती. खेळाडू आणि प्रशिक्षक अशा दोन्ही भूमिकांतून विश्वचषक जिंकण्याची अलौकिक कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली.पण अशी कामगिरी करणारे ते पहिले नव्हेत. तो मान जातो ब्राझीलचे मारियो झागालो यांच्याकडे. झागालो हे नाव सुपरिचित ब्राझिलियन फुटबॉलपटूंच्या मांदियाळीतले नव्हे. पेले, गॅरिंचा, सॉक्रेटिस, रोमारियो, रोनाल्डो, रोनाल्डिन्यो, काका, नेमार अशांची नावे जगभर ठाऊक. या रंगमंचावर झागालो हे नेहमीच विंगेत राहिले. तेही बेकेनबाउर यांच्यासारखे बचावपटूच, पण तरीही वेळ पडेल तेव्हा बगलेवरून सुसाटत धावत जायचे. १९५८ आणि १९६२ मधील विश्वविजेत्या ब्राझिलियन संघाकडून ते खेळले. तरी त्यांचे खरे कर्तृत्व दिसून आले, १९७०मधील सर्वोत्तम ब्राझिलियन विश्वविजेत्या संघाचे प्रशिक्षकपद सांभाळताना. नितांतसुंदर आक्रमक चाली रचताना बचावाचे भानही हवे या भूमिकेतून त्यांनी तो संघ बांधला. लोकांसमोर आला तो पेले आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा अलौकिक खेळ. परंतु त्या संघाचे शिल्पकार होते मारियो झागालो. त्यांचे खेळाडूंना सांगणे असे - मनमुराद खेळा आणि त्या खेळाचा आनंद प्रेक्षकांना द्या.झागालो आणि बेकेनबाउर. विश्वविजेते खेळाडू आणि विश्वविजेते प्रशिक्षक. दोघेही गेल्या काही दिवसांत निवर्तले. या दोघांव्यतिरिक्त अशी सोनेरी दुहेरी कामगिरी करणारे केवळ फ्रान्सचे दिदिए देशांजच आता हयात आहेत. बेकेनबाउर आणि झागालो यांना फुटबॉलमधील सौंदर्याची जाण होती, तसेच सातत्याचे भानही होते. आज ब्राझील आणि जर्मनीकडे फुटबॉलमधील महासत्ता म्हणून कुणीही पाहत नाही. बहुधा सौंदर्य की सातत्य, या गोंधळात दोन्ही फुटबॉल संस्कृतींचे स्वत्व हरपलेले दिसते. दोन्ही व्यवस्था आज काहीशा कुचेष्टेचाच विषय ठरतात. बेकेनबाउर आणि झागालो यांचे निर्गमन हे त्यामुळेच प्रतीकात्मक आणि खंतावणारेही!

भूगोल: वेगळ्या अध्ययनशास्त्राचा दर्जा प्राप्त!

(जागतिक भूगोल दिन विशेष.)

अलीकडे भूगोल विषयाचे महत्त्व सर्वच संबंधितांना कळेनासे झाले आहे. शालेय पातळीवर तर सर्वच संबंधित मंडळी केवळ ४० गुणांचा विषय म्हणून त्याकडे दुर्लक्षित करतात. फक्त इंग्रजी, विज्ञान व गणित हेच जणू शालेय विषय असल्याचे मानून सामाजिक शास्त्रांकडे अक्षम्य दुर्लक्ष करतात. खरं म्हणजे विकासाच्या कोणत्याही समस्येमध्ये स्थानिक भूगोलाचे ज्ञान महत्त्वाचे असते. गाव आणि पंचक्रोशीचा भूगोलदेखील स्थानिक समस्या सोडविण्यास उपयोगी ठरतो. मात्र शासनाने फारसा विचार न करता 'जिल्हा - भूगोल' ही संकल्पनाच सोडून दिली, असे इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रमावरून लक्षात येते. असा श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित लेख वाचनीयच... संपादक

सोळाव्या व सतराव्या शतकांमध्ये क्रिस्तोफर कोलंबस, मार्को पोलो व जेम्स कूक यांनी पुष्कळ नवीन प्रदेशांचा शोध लावला. त्यांच्या अनुभवांवरून काही नकाशे नव्याने तयार करण्यात आले. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमध्ये भूगोलाला वेगळ्या अध्ययनशास्त्राचा दर्जा प्राप्त होऊन युरोपमधील प्रमुख विश्वविद्यालयांमध्ये भूगोलाचे अध्ययन होऊ लागले. यात प्रामुख्याने पॅरिस व बर्लिन विश्वविद्यालयांचा समावेश होता. अठराव्या शतकामध्ये भूगोलाच्या अभ्यासाकरिता अनेक भौगोलिक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात १८२१ साली स्थापन झालेली सोसायटी दी जिओग्रॉफी, सन १८३० साली स्थापन झालेली रॉयल जियोग्राफिकल सोसायटी, सन १८४५ साली स्थापन झालेली रशियन जियोग्राफिकल सोसायटी, सन १८८८ साली स्थापन झालेली नॅशनल जियोग्राफिक सोसायटी यांचा प्रामुख्याने समावेश होता. भूगोलाचा तत्त्वज्ञानाच्या शाखेपेक्षा विज्ञानाच्या शाखेशी संबध जोडण्यासाठी रिम्युल कान्ट, अलेक्झांडर वोन हुम्बोल्ट, कार्ल रिटर आणि पॉल विडाल डीला ब्लैंचे यांनी योगदान दिले.

गेल्या दोन शतकांमध्ये संगणकाच्या नवशोधामुळे भूगोलाच्या अध्ययनात जियोमॅटिक्स आणि इतर संबंधित पद्धतींचा वापर प्रभावीपणे होत आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये विसाव्या शतकापासून पर्यावरणीय सिद्धान्त, प्रादेशिक भूगोल, परिणामीय क्रांती-आंकड्याच्या साहाय्याने परिणाम-निश्चिती, समालोचनात्मक भूगोल अशा विविध मार्गांनी भूगोलाचे अध्ययन होत आहे. भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, जनसंख्याअध्ययनशास्त्र यांचा भूगोलाशी घनिष्ट असा आंतरसंबध आहे. यामुळे भूशास्त्राचे सर्वांगाने अध्ययन होण्यास मदत होत आहे.

भूगोल दिनाचे कर्मकांड-मकरसंक्रांतीला मुलांना शाळेत तिळगूळ वाटला जातो. मात्र भूगोल दिनाबद्दल गोल दिला जातो-काहीही माहिती दिली जात नाही. ऋतुबदल होण्याचा हा दिवस भूगोलात महत्त्वाचा आहे. म्हणून याच दिवशी भूगोल दिन साजरा करण्याचे ठरले. शालेय पातळीवर मात्र भूगोल विषयाची अक्षम्य उपेक्षा सुरू आहे... हेच दुर्दैव आपले! गेली तीस वर्षे १४ जानेवारी हा भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. विषयानुरूप दिन पाळण्याची एक परंपरा महाराष्ट्रात रुजू झाली आहे. मराठी दिन- २७ फेब्रुवारी, विज्ञान दिन-२८ फेब्रुवारी, तर संस्कृत दिन-आषाढस्य प्रथम दिवसे इत्यादी. त्याप्रमाणे अत्यंत महत्त्वाचा पण दुर्लक्षित असा विषय म्हणजे भूगोल. देशाच्या पातळीवरील भूगोल विषयतज्ज्ञ प्रोफेसर चं.धुं. ऊर्फ सी.डी.देशपांडे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार सन १९८६मध्ये पुणे येथे पं.भीमसेन जोशी यांच्या हस्ते झाला होता. पुण्यातील पत्रकार, लेखक डॉ.सुरेश गरसोळे यांनी तो घडवून आणला होता. तेव्हापासून मकरसंक्रांतीच्या दिवशी डॉ.देशपांडे यांचा जन्मदिन महाराष्ट्रभर भूगोल दिन म्हणून विशेषतः शालेय पातळीवर फक्त नावालाच सुरू आहे. मकरसंक्रांतीला मुलांना शाळेत तिळगूळ वाटला जातो. ऋतुबदल होण्याचा हा दिवस भूगोलात महत्त्वाचा आहे. म्हणून याच दिवशी भूगोल दिन साजरा करण्याचे ठरले. त्यानुसार भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे उपक्रम निवडले जावेत. व्याख्याने, ध्वनिफिती दाखवून भौगोलिक घटकांचे महत्त्व सांगणे, भौगोलिक सहली, नकाशे व इतर भौगोलिक साहित्याची प्रदर्शने, भौगोलिक विषयावर निबंध लिहिणे, इतर विषयांशी असलेला भूगोलाचा सहसंबंध असे अनेक उपक्रम घेतले जावेत, असे अभिप्रेत आहे. वर्षांतून एकदा तरी या विषयावर लक्ष केंद्रित व्हावे, या उद्देशाने अनेक उपक्रम घेतले जावेत, हे अपेक्षित असते.

अलीकडे भूगोल विषयाचे महत्त्व सर्वच संबंधितांना कळेनासे झाले आहे. शालेय पातळीवर तर सर्वच संबंधित मंडळी केवळ ४० गुणांचा विषय म्हणून त्याकडे दुर्लक्षित करतात. फक्त इंग्रजी, विज्ञान व गणित हेच जणू शालेय विषय असल्याचे मानून सामाजिक शास्त्रांकडे अक्षम्य दुर्लक्ष करतात. खरं म्हणजे विकासाच्या कोणत्याही समस्येमध्ये स्थानिक भूगोलाचे ज्ञान महत्त्वाचे असते. गाव आणि पंचक्रोशीचा भूगोलदेखील स्थानिक समस्या सोडविण्यास उपयोगी ठरतो. मात्र शासनाने फारसा विचार न करता 'जिल्हा - भूगोल' ही संकल्पनाच सोडून दिली, असे इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रमावरून लक्षात येते. एकूणच अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके, विद्यार्थ्यांसाठी कृती-पुस्तिका, शिक्षकांसाठी तयार केलेल्या हस्तपुस्तिका, शिक्षकांचे प्रबोधन, विषयातील नवनवीन संकल्पना व संज्ञा त्याचबरोबर संदर्भ पुस्तके या सर्वच बाबतीत निदान भूगोल विषयाबाबत अत्यंत उदासीनता निर्माण झालेली आहे. ही उदासीन वृत्ती एवढ्या टोकाला गेलेली आढळते की पाठ्यपुस्तके कशीही असोत, जड व बोजड असोत, असंख्य चुकांनी भरलेली असोत, त्यातील नकाशांचे स्वरूप कितीही चुकीचे व क्लिष्ट असो, वर्षानुवर्षे अशी पुस्तके तशीच शिकविली जातात! अध्यापकांनाही विषय-ज्ञान नसते, पदवीला विषय एक व अध्यापन दुसऱ्याच विषयाचे! असा प्रकार असल्यावर त्यांना आत्मविश्वास कसा वाटणार? याउलट विषयज्ञान पक्के असेल तर विषय अध्यापनाच्या विविध पद्धती- मॉडेल्स हाताळता येतील. पण प्रत्यक्षात शिक्षकांचे जाऊ द्या, तर डिटी.एड् किंवा बी.एड्ला जे मेथड-मास्टर्स असतात त्यांचाही पदवीला भूगोल विषय नसतो! तरीही असे बहादर अध्यापक भूगोल विषय कसा शिकवावा? यावर खोट्या आत्मविश्वासाने शिकवित असतात! त्यांच्यासाठी तर ज्ञानरचनावाद ही सध्याची कळीची संकल्पना 'कोसों दूर है!' अगदी खरं सांगायचं तर बालभारती व राज्य शिक्षण मंडळामधली तथाकथित तज्ज्ञ लेखकमंडळी पाठ्यपुस्तके तयार करताना केवळ पाठ्या टाकण्याचे काम करीत असतील व असंख्य चुका करीत असतील तर एकूणच आपल्या राज्यात भूगोल विषयाचे अध्यापन केवळ 'दिन' साजरे करून कसे सुधारणार? शेवटी दीनच राहणार.

तज्ज्ञांच्या उ?द्विग्नतेची प्रमुख कारणे-राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे एप्रिल २०१३ मध्ये प्रकाशित झालेले १०वीचे भूगोलाचे पाठ्यपुस्तक, हे पुस्तक महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी कसे घातक व भयानक आहे, हे स्पष्ट करूनही मंडळ त्यावर जून २०१८ पासून कार्यवाही करून बदल करणार. इयत्ता तिसरीपासून बारावीपर्यंत एकाही पाठ्यपुस्तकात भारतात पर्जन्यमानाचे वितरण दाखविणारा नकाशा अंतर्भूत केलेला नाही. चुका करणारे मंडळ पूर्वीच्या सरकारने बरखास्त केल्यावर विद्यमान सरकारने पुन्हा त्यातील कथित तज्ज्ञांना नवीन समितीवर घेतले आहे. विधानसभेत एकूण ४८ आमदार जोशात उभे राहिले व दहावीच्या पुस्तकाचा निषेध करून विविध शिक्षा सुनावीत होते. ते सर्व विरोधी पक्षातील आमदार आता स्वस्थ आहेत, कारण आता त्यांचे राज्य आले आहे. महाराष्ट्राच्या लोहमार्ग दाखविणाऱ्या नकाशात शिर्डी व उस्मानाबाद स्थानकांचा पत्ता नाही, तरीही तेथील आमदार काहीच कसे बोलत नाहीत? अशा १०० चुका दाखविल्यावरही शालेय शिक्षणखाते गप्प आहे. कशाला करावा साजरा भूगोल दिन? त्यापेक्षा श्राद्ध घालावा, असे वाटते. अशी भूगोल विषयाची बेइज्जतीच भूगोल दिनास मारक आहे, हे आधी ध्यानी घ्यावे लागेल.

संक्रांत सण ..

मानवैः
दत्त्वकव्यानि
संक्रांतौ यानि दत्तानि
तानि नित्यं ददात्यकः
लाभहोई पुनर्जन्मनि

पहिलासण
सुखदाई
नववर्षात प्रारंभदिनी
संक्रांत अशुभ असूते
अंध श्रध्दा नको मनी

पौष्टिकभाज्या अनेक
हुरडा बोरे ढाळा वनी
गोड गुलाबी थंड हवा
सुशोभित छानअवनी

हळदीकुंकूम समारोह
विधवा अने सुवासनी
एकत्र येतात निमीत्ते
मुलगीमाता न् भगिनी

तिळ गुळ घ्यावे द्यावे
नाते जोपावे आनंदानी
प्रारंभ नवीन पर्वाचा
वैर भाव तो विसरूनि

दानधर्म हे पुण्य कर्म
घडावे चागले हातूनी
सकल भद्रणीपश्येयूति
हुकार उमळे आतुनि

पतंगोत्सव आनंदाचा
सकल धर्मिया घेऊनि
पर्यावरणा सांभाळावे
नियमा सन्मान देऊनि

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

गड्डा जत्रा ..

सोलापुराची
परंपरा
रे अद्भुत गड्डा
ज़त्रा
संक्रातीच्या
निमित्ते
सिध्देश्वराची
यात्रा

आबालवृद्धां आवडे
दुकाने भरती सतरा
मैतरलेले दिवस ते
चक्कर मारू मित्रा

पंचक्रोशीत उत्साह
बदलून टाकी चित्रा
रोमचिक एसेल वर्ड
शहारेल गात्रा गात्रा

तळयातले सिध्देश्वर
रोषणाई भुलवे नेत्रा
प्रतिबिंब उत्सवाचे
आठवे तया चरित्रा

बहुविध जाती धर्म
जमतात एका छत्रा
राव रक लहानथोर
गुफतात एका सूत्रा

यंदा नाही हिरमोड
कोरोनाचा ना खत्रा
कृपा करा सिद्धेश्वरा
सुचवावी भलीमात्रा

जगभरी फिरे जरी
इथे यावे वाटे मित्रा
सोलापूरी नाळजुळे
खुणावते गड्डा यात्रा

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६..

!! भूगोल दिन निमित्त देशवासियांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

महाराष्ट्रात बनणार २२ नवीन जिल्हे; नवीन जिल्ह्यांची यादी आली समोर, पहा



दै, जनप्रभात छ.संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी ■ मोहन आखाडे

छत्रपती संभाजीनगर भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर महाराष्ट्रात २६ जिल्हे तयार करण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), ठाणे, कुलाबा (रायगड), रत्नागिरी, बृहन्मुंबई, नाशिक, धुळे, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, बुलढाणा, अहमदनगर, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, जळगाव, भंडारा, चांदा (आताचे नाव चंद्रपूर) या जिल्ह्यांचा समावेश होता.

यानंतर मग गरजे आणि मागणीनुसार नवीन जिल्ह्यांची निर्मिती शासनाच्या माध्यमातून करण्यात आली. तब्बल दोन दशकांच्या म्हणजेच वीस वर्षांच्या काळात महाराष्ट्रात नवीन १० जिल्हे तयार झाले आणि सध्यांतरी २२ प्रस्तावित जिल्ह्यांची मागणी आहे.

२२ प्रस्तावित जिल्हे

नाशिक जिल्ह्याचे विभाजन करून मालेगाव आणि कळवण हे दोन जिल्हे तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे विभाजन करून शिर्डी, संगमनेर आणि श्रीरामपूर हे तीन जिल्हे नव्याने तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

ठाणे जिल्ह्याचे आणखी विभाजन करण्याचा प्लॅन असून मीरा-भाईंदर आणि कल्याण या दोन जिल्ह्यांची निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे.

ठाणे जिल्ह्यातून तयार झालेल्या पालघर जिल्ह्याचे देखील विभाजन करण्याचा प्लॅन आहे. जिल्ह्याचे विभाजन करून जव्हार हा नवीन जिल्हा तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

पुणे जिल्ह्यातून शिवनेरी जिल्हा तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

रायगड मधून महाड जिल्हा तयार केला जाणार आहे.

सातारा जिल्ह्यातून माणदेश जिल्हा तयार केला जाणार आहे.

रत्नागिरी मधून मानगड जिल्हा तयार करण्याचे नियोजन आहे.

बीडमधून आंबेजोगाई जिल्हा तयार करण्याचे नियोजन आहे.

लातूर मधून उदगीर जिल्हा तयार करण्याचे नियोजन आहे.

नांदेड मधून किनवट जिल्हा तयार करण्याचे नियोजन आहे.

जळगाव जिल्ह्याचे विभाजन करून भुसावळ जिल्हा तयार करणे प्रस्तावित आहे.

बुलढाणा जिल्ह्यातून खामगाव जिल्हा तयार होणार आहे.

अमरावती जिल्ह्याचे विभाजन होईल आणि अचलपूर हा नवीन जिल्हा तयार होणार आहे.

यवतमाळ जिल्ह्याचे विभाजन करून पुसद हा नवीन जिल्हा तयार करण्याचे नियोजन आहे.

भंडारा जिल्ह्याचे विभाजन करून साकोली हा नवीन जिल्हा तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन प्रस्तावित असून यातून चिमूर हा नवीन जिल्हा तयार केला जाणार आहे.

गडचिरोली यादेखील जिल्ह्याचे विभाजन करणे प्रस्तावित असून यातून अहेरी हा नवीन जिल्हा तयार केला जाणार आहे.

हनुमान पुत्र मकरध्वजाचे देशातील एकमेव मंदिराची पार्श्वभूमी

महाराष्ट्र ही देवस्थान व तीर्थक्षेत्रांनी गाजवलेली भूमी आहे. या भूमीवर खूप मोठा इतिहास होऊन गेला. मग तो पंढरपूर, आळंदी, त्र्यंबकेश्वर अथवा तुळजापूरचा विविध देवस्थान मधला असो या देवस्थान विषयी आपल्या मनामध्ये खुपसले असतो देवस्थानांच्या दर्शनाला जाताना मनाला लागली हुरहूर खूपच आनंददायी असते बीड जिल्ह्याला महान संतांची परंपरा लाभली आहे जिल्ह्यात अनेक व्यक्ती होऊन गेल्या वैकुंठवासी ह. भ. प .ज्ञानेश्वर महाराज यांनी चाकरवाडी या गावाला तीर्थक्षेत्र बनवले आहे त्यांनी आपल्या वाणीने अनेकांचा उद्धार केला, हे आपण पाहिले आहे. अशाच प्रकारचे एक देवस्थान म्हणजे चिंचवण येथील मकरध्वज मंदिर होय. या मंदिराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे मकरध्वज मंदिर हे भारतात दोन ठिकाणी आहे, एक काशी व दुसरे चिंचवण म्हणून चिंचवणला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. मकरध्वज हाहनुमानाचा मुलगा आहे, सर्वांना



प्रश्न पडणे साहाजिकच आहे .कारण हनुमान हा ब्रह्मचारी मग मुलगा कसा .पण हनुमानाच्या घामापासून मकरध्वजाचा जन्म झाला आहे. जेव्हा लंका दहन केले तेव्हा समुद्रामध्ये हनुमंताने घाम टाकला तेव्हा त्यापासून मकरध्वजाचा जन्म झाला. या अग्रलेखात आपण चिंचवण गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी रामायणातील युद्ध कांडातील संदर्भा नुसार सांगता येईल. युद्धा मध्ये सर्व रथी - महारथी शत्रुपक्षाने ठार केल्यामुळे रावणाची अवस्था बिकट झाली. अत्यंत उदासीन होऊन विचार करत असता त्याला महिकावती नगरीतील अहिरावण महिरावण यांची आठवण झाली त्याचबरोबर रावणाने सोबत दोघांना संदेश देऊन दुत्ता करवी सिता स्वयमवरा पासून अगदी सर्व वरण निवेदन केले. हे वृत्त ऐकून अही- मही रावणाने आश्वासने दिली. त्या दोघांनी अंबिकेची आराधना करून तिला प्रसन्न केले. परंतु अंबिकेने तिला डावाच कोल दिला. नंतर अही-महि रावण यांनी वानर सैन्यात जाऊन राम-लक्ष्मणाला भुयारी मार्गाने पाताळात आणले. मारुती रात्रीच्यावेळी सैन्यात राम-लक्ष्मणाला शोधले, पण त्यांना राम-लक्ष्मण दिसले नाहीत. त्याच वेळेला तो घाबरून गेला ,सर्वत्र शोधाशोध करुन जेव्हा ते सापडेना तेव्हा त्याने बिबीशन व सुग्रीव यांच्याकडे सैन्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली व आपण स्वतः शोधासाठी बाहेर पडले .परंतु कोठे जावे हे त्यांच्या लक्षात येईना म्हणून त्यांनी राम-लक्ष्मणाला शोध करावा म्हणून मार्गदर्शन करावे अशी आदिशक्तीला शरण जाऊन तिची कळकळीची प्रार्थना केली.

मारुतीचे सामर्थ्य आदिशक्तीला माहीत होते. तेव्हा त्याचा कोप सर्वांना भस्म करुन टाकीन हे ओळखून आदिशक्तीने गुप्तपणे रामाच्या शोधाची माहिती देण्याचे ठरवले .जवळच एका झाडावर गिधाडाचे जोडपे बसले होते. त्या मादीच्या शरीरात आदिशक्तीने प्रवेश केला .गिधाडाने सांगितले राम लक्ष्मण यांना अही - मही रावणाने भुयारी मार्गाने पाताळात चोरून नेले आहे ते भुयार दाखवले. इकडे राम-लक्ष्मणाला पाताळात नेल्यावर अही-मही रावणांनी त्यांना नगराबाहेर मकरध्वजाच्या कडेकोट बंदोबस्तात ठेवले. मकरध्वज याच्या साह्याने १४००० राक्षस द्वारा रक्षणासाठी ठेवली होते. हनुमंताने पातळात प्रवेश करून तापसवेश घेऊन प्रवेश करण्यासाठी दाराजवळ आला आणि त्यांनी अद्भुत शक्ती सोडून सर्व राक्षसांनी निद्रिस्त केले. मध्यरात्रीच्या वेळी असा हा तापसवेशातील मारुती दारातून प्रवेश करू लागताच मकरध्वजाने आडवले .कारण त्या शक्तीचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही तो जाग्रत असल्यामुळे त्याने मारोतीला अडवले व अवेळी भिक्षा मागण्यासाठी नगरातून त्या बद्दल त्यांला दोष दिला व लागलीच इथून निघून जाण्यास मारुतीला सांगितले. त्यामुळे मारुतीला संताप होऊन युद्धाला सुरुवात झाली. परस्परांमध्ये आघात - प्रघात होऊन कोणीही कोणाला आवरेना. मारुतीच्या आघाताने आजवर कोणी प्रारास्त झाला नाही असे कधी घडले नाही, पण यावेळी मकरध्वज यावर मारुतीच्या हल्ल्याचा काहीही परिणाम होईना. म्हणून मारुतीने शंका करून त्यांनी मकर ध्वजाला त्यांची ओळख विचाली. त्याने सांगितले की मी वायु सूत हनुमानाचा पुत्र आहे . मी अही-महिरावण यांचा विचार रक्षक आहे. त्यांच्या कुलस्वामिनीला मानवाचे बलिदान देण्यासाठी दोन मानव येथे पकडून आणले असून त्यांना नेण्यासाठी कोणी विर येईल म्हणून माझी येथे योजना केली आहे. हे मग त्याचे बोलणे ऐकून हनुमान संतापला.मकरध्वजाने आपल्या मातेला त्यावेळी बोलवले त्यांनी सर्व इतिहास सांगितला .आपल्या मातेचे हे बोलणे ऐकताच मकरध्वज - हनुमंत यांनी एकमेकांना आलिंगन दिले व परस्परांचे मिलन झाले. राम प्राप्ती कशी होईल हे मारुतीने मग त्याला विचारले त्यावेळी स्वामी द्रोहाची अडचण मकरध्वजाने सांगितल्यावरून मारुती जेथे अही-महिरावण अंबीकेची आराधना करत होते तेथे स्वतः आला व त्यांने स्वतः अंबीकेची स्तुती केली. अंबिका संतुष्ट होऊन आपल्या जागी मारुतीची स्थापना केली व ती निघून गेली. नेहमीप्रमाणे हे दोघे राक्षस मध्यरात्रीच्या वेळी पूजेसाठी अंबिकेच्या जवळ देवळात आले. तिची त्यांनी यथा विधी पूजा केली व ते तिला नेवैद्य दाखवु लागले. मग मूख पसरून नेवैद्य खाण्यास प्रारंभ केला. त्या अही रावणाला वाटले की देवी प्रसन्न झाली म्हणून त्यांनी प्रसादासाठी विविध प्रकारची फळे साठी विविध पक्वान्ने समोर ठेवली ती सर्व भक्ष करून टाकली तरी देव तेची तृप्ती झाली नाही .मग अही-मही रावणाने राम लक्ष्मणाचा बळी देण्यासाठी आणायचे ठरवले. देवीपुढे राम लक्ष्मण यांना आणतांना नगरीतील लोकांनी रामस्वरूप पाहताच नागरिकही मोहीत झाले. राम-लक्ष्मणाला बळी देण्यासाठी नेत आहेत म्हणून त्या नगरीतील नागरिकांनी राक्षसांना शाप दिला. राम लक्ष्मण यांना देवी पुढे आणल्यानंतर राक्षसांनी इष्ट देवतेचे स्मरण करण्यास रामाला सांगितले. आपल्या इष्ट देवता म

ऑनलाईन वधु वर परिचय मेळावा काळाची गरज- आमदार दत्तात्रय भरणे

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार

हिंदू शेगर धनगर समाज विकास मंच, महाराष्ट्र राज्य आयोजित करण्यात आलेला ऑनलाईन वधू वर परिचय मेळावा नुकताच यशस्वीरित्या संपन्न झाला. या ऑनलाईन मेळाव्याचे उद्घाटन माजी राज्यमंत्री तथा इंदापूर तालुका विद्यमान आमदार मा.ना.दत्तात्रय भरणे यांनी फोन वरून शुभेच्छा देऊन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हिंदू शेगर - धनगर समाजसेवा महासंघ माजी अध्यक्ष ?ड.श्री.गुलाब गावडे होते, आधुनिक काळाची गरज ओळखून घर बसल्या महाराष्ट्रातील समाजापर्यंत पोहोचण्यासाठी उत्कृष्ठ मार्ग निवडला आहे व आपले कार्य असेच चालू ठेवावे असे मनोगत व्यक्त केले.

या ऑनलाईन मेळाव्यासाठी श्री.सुनीलतात्या भगत, श्री.प्रतापराव पाटील, श्रीमती सुनीताताई गावडे, सौ.अश्विनी खर्से,श्री.शिवलाल गावडे, श्री.अप्पासाहेब रांधवण श्री.शिवाजीराव गावडे,व इतर मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

समाजातील अनेक लोकांना वाटते की ज्यांचे लग्न जमत नाही त्यांनीच परिचय मेळाव्याला सहभागी व्हावे, पण असं काही नाही वधू वर परिचय मेळावा ही आजच्या बदलत्या काळाची गरज आहे, समाजाची शैक्षणिक व सामाजिक प्रगती होत असली तरी सामाजिक स्नेहभाव कमी होत चालला आहे अशा वेळी सामाजिक जबाबदारीचं भान ठेवून हिंदू शेगर धनगर समाज विकास मंचने ऑनलाईन पद्धतीने मोफत वधुवर परिचय मेळावा सर्वांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

या विकासमंचचे खरे काम कोरोना काळापासून व्हॉट्स ?प ग्रूपव्दारे चालू झाले, आणि त्याचे रूपांतर ऑनलाईन मेळाव्यात झाले, पहिल्या मेळाव्यात जवळपास १५० वधु वर सामील झाले होते तसेच दुसऱ्या मेळाव्यामध्ये जवळपास २५० वधु वर सामील झाले, तर या वर्षीच्या मेळाव्यामध्ये जवळपास ३०० वधु वरांनी सहभाग घेतला. आजपर्यंत या संस्थेच्या मार्फत जवळपास १५० हून जास्त विवाह जुळून आलेली आहेत.

या मेळाव्यासाठी महाराष्ट्रासह अनेक राज्यातून व परदेशातून वधू वर ऑनलाईन सहभागी झाले होते.

आधुनिक तंत्रज्ञान वापरून ऑनलाईन पद्धतीने वधुवर परिचय मेळावा झूम ?पवर घेण्यात आला,आजच्या धावपळीच्या युगात वेळ व पैशाची बचत होऊन घरबसल्या अनेक स्थळांची माहिती समाजाला मिळाली.तसेच इतर समाजाने सुध्दा याचे अनुकरण करावे असे आदर्शवत कार्य या संघटनेने केले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदू शेगर धनगर समाज विकास मंच अध्यक्ष श्री. रामदास येडेपाटील यांनी केले, वधू वर बायोडाटा वाचन संघटनेचे सचिव, प्रा.अजय गाढवे व कार्याध्यक्ष,प्रा.संभाजी साबळे यांनी केले, तर सूत्रसंचालन सहसचिव श्री.सतिश शिंगाडे व आभार उपाध्यक्ष, श्री.रामदास बिबे यांनी मानले.



आ.शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कोरेगावपासून सातारपर्यंत दि.२३ रोजी धडक मारणार !



सातारा ■ जीवन मोहिते

विधान परिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जे आंदोलन सुरू आहे.त्या कोरेगाव या ठिकानापासून म्हणजेच तहसीलदार कार्यालय ते जिल्हा अधिकारी कार्यालय,सातारपर्यंत दि.२३ रोजी धडक मारणार असल्याचे रमेश उबाळे यांनी स्पस्ट केले.

कोरेगाव शहरातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी तसेच कोरेगाव नगरपंचायतीमधील भ्रष्टाचारा विरोधात आमदार शशिकांत शिंदे यांनी कोरेगाव येथील आंदोलन स्थळी भेट देऊन पुढील दिशा स्पष्ट केली आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी आ.शिंदे कोरगाव शहरातील नागरिकांसमवेत लढ्यात उतरणार आहेत.

वाय जे एम कॉलेजच्या प्राध्यापीका भोरे मॅडम यांनी कबड्डीपटू आदित्यचा केला वाढदिवस साजरा : कोणतीही ओळख नसताना

माणुसकी जिवंत राहावी म्हणून वाढदिवस साजरा करण्यात आला प्राध्यापक भोरे मॅडम यांचे वक्तव्य

तळेगाव (श्या.पंत) ■ राजेंद्र खंडारे

तळेगाव श्यामजी पंत : माणुसकीची ओळख दाखवत वाय जे एम कॉलेज तळेगाव श्यामजीपंत च्या प्राध्यापीका सौ भोरे मॅडम यांनी तळेगाव येथील मॉडेल हायस्कूल मधील नववीचा विद्यार्थी आदित्य खंडारे याचा आज दिनांक १३ जानेवारीला वाढदिवस होता आणि आदित्य हा वाय जे एम कॉलेजच्या समोर असलेल्या ग्राउंडवर कबड्डी खेळत असताना त्याचे मित्र त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होत्या हे भोरे मॅडम नी बघितले की या मुलाचा वाढदिवस आहे हे ऐकतात प्राध्यापक मॅडम यांनी केक पेढा व चिवडा बोलावून त्याला व त्याच्या मित्राला आवाज देऊन ऑफिसमध्ये बोलावले व आदित्यला म्हणाल्या की मी तुझा वाढदिवस साजरा करतो ये बस आणि सुट्टी झाल्यानंतर विद्यार्थी व कर्मचारी घेऊन आदित्यचा वाढदिवस साजरा केला कारण की यांनी नवीन येणाऱ्या पिढीला व विद्यार्थ्यांना व जनतेला एक प्रेरणा देण्याचे काम केले त्यावेळी सर्व कर्मचारी विद्यार्थी व आदित्यचे मित्र हे भाविक झाले व आदित्यच्या आई-वडिलांना आदित्य नी सांगितले तेव्हा प्राध्यापक भोरे मॅडम यांचे आभार मानले यातून प्राध्यापक भोरे मॅडम यांनी जनतेला एक असा माणुसकीचा संदेश दिला कोणते नाते आदित्येशी नसताना सुद्धा मॅडमने माणुसकी दाखवली तसेच आदित्यला दिलेल्या खाऊच्या पैशातून त्याने जनरल नॉलेजचे एक पुस्तक खरेदी केले जेणेकरून त्यांनी सुद्धा आपली माणुसकी दाखवली व प्राध्यापक भोरे मॅडम म्हणतात की मी जसे केले तसे तुम्ही सुद्धा करा अशाने माणुसकी सुद्धा जागृत होतात अशाप्रकारे वाढदिवसाच्या औचित्य साधून माणुसकीचा संदेश देण्यात आला.



रक्तदानाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

कारंजा (घा.) ■ गौरव सोमकुवर

कारंजा - स्थानिक मनुविद्या सामाजिक संस्था, कारंजा द्वारा संचालित सनशाईन स्कुल, कारंजा व श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बालसंस्कार विकास केंद्र, कारंजा यांचे संयुक्त विद्यमाने स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ अर्थात जिजाबाई भोसले व आपल्या संस्कृतीची छाप संपूर्ण जगावर टाकणारे स्वामी विवेकानंद ज्यांचा जन्मदिवस भारतात राष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो ज्यांनी धर्म, मानवता, स्वातंत्र्य, वेदान्त तत्वज्ञान या सारख्या इतर अनेक विषयांवर त्यांचे विचार नेहमीच प्रत्येक भारतीयाला मार्गदर्शक ठरतात. त्यांची ओळख आणि विचाराची प्रगल्भता समाजात व विद्यार्थ्यांत निर्माण व्हावी त्या निमित्ताने



सनशाईन स्कूल कारंजा येथे गेल्या २००३ पासून संस्थाध्यक्ष प्रेम महिले व सचिव विजय ठाकरे यांचे संकल्पनेतुन सुरू असलेल्या रक्तदान शिबिराचे २१ वे वर्षाची नियमित शृंखला डॉ हेडगेवार रक्तसंकलनपेढी, नागपूर यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पूर्ण पडली ज्यामध्ये ६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले ज्यात प्रामुख्याने ४ महिला सौ. कांचन जयंत टावरी, सौ. रोशनी हेमंत बन्नगरे, सौ. मृणालिनी मुकेश टूले व सौ. प्रीती प्रेमसिंग महिले आणि अंधत्व असूनही सातत्याने चौथ्यांदा रक्तदान करणारा आकाश मोहन डोबले यांचा समावेश आहे तसेच दहावीच्या विद्यार्थिनींनी रक्तदानावर आधारित सुबक अश्या रांगोळ्या काढून रक्तदानाविषयी रक्तदानाचे महत्व उपस्थित पालक व शाळेतील विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श म्हणून ठेवले सर्व रक्तदाते व रांगोळी काढणाऱ्या विदयार्थ्यांचे अभिनंदन व आभार आयोजक प्रेम महिले व संयोजक पवन ठाकरे, हेमंत बन्नगरे, प्रणव महिले, मंगेश भगत श्रद्धा मनीष चापले, प्रेम महिले श्रद्धा फडफड, निलेश ढोले, संगीता चापले व समस्त शिक्षक व श्री स्वामी समर्थ केंद्रातील सेवेकऱ्यांनी केले तसेच जि. टी. फिटनेस क्लब, कारंजा व सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को -ऑप, सोसायटी लि. शाखा कारंजा यांनी रक्तदाते बाबत विशेष सहकार्य केले तसेच स्वामी विवेकानंद जयंतीला अनुसरून वर्ग ६ ते ७ करिता वक्तृत्व स्पर्धा व वर्ग ८ ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली.

'स्वतंत्र विदर्भ राज्य व काटोल जिल्हा निर्मितीसाठी २४ जानेवारी ला मध्यप्रदेश ची बॉर्डर रोखणार' : विराआस;विदर्भ राज्य आंदोलन समिती काटोल तालुक्याची बैठक संपन्न

काटोल ■ प्रशांत पवार

विश्रामगृह, काटोल येथे पूर्व विदर्भ विभाग अध्यक्ष अरुण केदार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. विराआस ने स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मिती करता 'करू- मरू किंवा जेल मध्ये सडू' असा निर्धार व्यक्त केला असून, घटनेच्या कलम ३ प्रमाणे केंद्र सरकारला राज्य देण्याकरता बाध्य करण्यासाठी, केंद्र सरकारचे ३१ जानेवारी पासून सुरु होत असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीकरीता सातत्याने आंदोलनाचा रेटा लावणारा दबाव गट म्हणून केंद्र सरकारने निर्णय घ्यावा याकरिता २४ जानेवारी २०२४ ला नागपूर जिल्हा महासचिव प्रदीप उबाळे पाटील यांच्या नेतृत्वात मध्यप्रदेश



सीमेवरील सावरगांव बडचिंचोली रस्त्यावर दुपारी १२ वाजता 'रस्ता रोको आंदोलन' करण्यात येणार आहे. या आंदोलनात विदर्भाचे नेते ?ड. वामनराव चटप सामील होणार असून, रस्ता रोको आंदोलनाच्या माध्यमातून स्वतंत्र विदर्भ राज्य व काटोल जिल्हा निर्माण करावे, वीज दरवाढ राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावी व शेतीपंपाला दिवसाचे लोडशेडींग बंद करावे, अन्नधान्यावरील जी. एस. टी तात्काळ रद्द करावा, कापसाला १५ हजार रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा, संत्र्याला ५० हजार रुपये प्रति हेक्टर मोबदला देण्यात यावा, सोयाबीन ला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा, अतिरुष्टी व पीकविमा धारकांना तात्काळ मोबदला देण्यात यावा, ही मागणी करण्यात येणार आहे.

काटोल तालुक्याच्या बैठकीला पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, नागपूर जिल्हा महासचिव प्रदीप उबाळे पाटील, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, नागपूर जिल्हा उपाध्यक्ष गुलाबराव धांडे, काटोल विधानसभा अध्यक्ष बाबाराव वाघमारे, शहर अध्यक्ष वीरेंद्र इंगळे, तालुका अध्यक्ष दिलीप सुतोने, उपाध्यक्ष प्रवीण राऊत, धीरज मांदळे, नागपूर जिल्हा युवा टायगर फोर्स अध्यक्ष पराग वैरागडे,मनोहर करोती, सुभाष नरोलिया, कृष्णा डफरे, सागर दुधाने, देविदास घायवट, अरुण परबत, धनश्री तिजारे, वसंतराव वैद्य, रामचंद्र बहुरूपी, डबरासे, जयसिंह गहलोद, चेतन उमाठे, देवेंद्र रोकडे रामराव पाटील, पुष्पा सावरकर, संगीता शेंडे,प्रीती देशभ्रतार, वनिताजी पाटील, डॉ सुधाकर कावळे,वीरेंद्र पवार, चेतन उमाठे,सुरेंद्र नासरे, उत्तम हनवटे, गणेश वरठी, नबी पठाण, वीणा वरगट, अनिता वासनिक, पुखराज रेवतकर, प्रभाकर नांदेकर, जनार्धन भिसे, मंगेश राऊत, पांडुरंग पोटे,उमाबाई शेंडे, प्रकाश डोंगरे सह शेकडो विदर्भवादी उपस्थित होते.

श्रीरामाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी शाळकरी मुली सरसावल्या



आष्टी (श.) ■ प्रतिनिधी

शाळकरी मुली आणि त्यांच्यासोबत विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक अयोध्येतील राम मंदिर पूर्णतः आले असून अनेकांचे श्रद्धास्थान असलेल्या राम लल्लाची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी रोजी होत आहे अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी निमंत्रण देण्यासाठी शाळकरी मुली सरसावल्या आहेत. ऋतुजा मांडवे, अनुश्री टेकाडे जानवी धोटे, वेदिका भोयर या मुली प्रत्येकाच्या घरी जाऊन अक्षदा सह अयोध्येतून आलेले श्रीराम जन्मभूमी निर्माणधीन मंदिर अयोध्या यांची प्रतिमा अक्षद देऊन घरोघरी दिवाळी साजरी करा असेही आव्हान करत आहे २२ जानेवारीला राम मंदिर चौक आष्टी येथे सकाळी सहा वाजता पासून तर रात्री दहा वाजेपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमांमध्ये समस्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे सुद्धा आवर्जून सांगण्यात येत आहे २२ तारखेला प्रत्येकाने घरातील विज लाइटिंग, दिवाळी सारखा सणसाजरा करावा नवीन कपडे घालावे घरासमोरील दिवे लावावे असे आव्हान भक्तांना करण्यात येत आहे.

नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा देण्यासाठी कटिबद्ध - खासदार कृपालजी तुमाने

येनवा येथे भव्य मोफत आरोग्य व शस्त्रक्रिया नोंदणी शिबीर;७३७ नागरिकांना चष्म्यांचे वाटप;खा. कृपालजी तुमाने शिवसेना वैद्यकीय कक्षातर्फे आयोजन

काटोल ■ गौरव मानकर

तालुक्यातील येनवा येथे भव्य मोफत आरोग्य व शस्त्रक्रिया नोंदणी शिबीर आयोजन करण्यात आले. नागपूर जिल्हा शिवसेना व खासदार कृपालजी तुमाने वैद्यकिय कक्षातर्फे भव्य शिबिराचे करण्यात आले होते. शिबिरात आयुष्यमान कार्ड आणि मोफत चष्मेही वाटप करण्यात आले. खासदार कृपाल तुमाने यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार कृपाल तुमाने वैद्यकिय कक्षामार्फत जिल्हाभर आरोग्य शिबीर राबवण्यात येत आहे. शिबिरात विविध रोगांचे तज्ञ डॉक्टर्स असून सर्व रोगांचे निदान करण्यात आले. आरोग्य शिबिरात ८४५ रूग्णांनी नोंदणी केली. तर ७३७ रूग्णांना चष्मे वाटप आणि १३५ रूग्णांची शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली. त्याचबरोबर ५१ नागरिकांचे आयुष्यमान कार्ड बनवण्यात आले. शिबिरात नेत्ररोग, मेडिसीन, सर्जरी, स्त्रीरोग, बालरोग, कान-नाक-घसा, अस्थिरोग, त्वचारोग, श्वसन रोग यासारख्या आजारांच्या तपासण्या आणि उपचार करण्यात आले. तसेच डोळ्यांची तपासणी करून मोफत चष्मांचे सुद्धा वाटप करण्यात आले. ज्या वृद्धांना डोळ्याचे ऑपरेशन्स सांगितले, त्यांना मोफत ऑपरेशन करण्याकरीता वेळ देण्यात आली आहे. विशेष म्हणजे हॉस्पिटल मधे ऑपरेशन करिता नेण्याची व परत आणण्याची आणि



इतर सर्व व्यवस्था देखील खासदार कृपाल तुमाने यांच्याकडून करण्यात आली आहे.

खासदार तुमाने यांनी शिबिराची पाहणी करत वृद्ध आणि रूग्णांशी संवाद साधला. तसेच नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप इटकेलवार, जि.प. सदस्य समीर उपम, भाजपा ओबीसी आघाडी जिल्हा अध्यक्ष दिलीप ठाकरे, सतिश रेवतकर, शिवसेना तालुका प्रमुख गंगाधर वंजारी, उपतालुका प्रमुख बंडु काठोळे, संजय भोंडे, सरपंच ललिता मोहन ठाकरे, उपसरपंच हरिषजी उमप, मोहन ठाकरे, विजय बाभूळकर, वैद्यकिय कक्ष समन्वयक सुरेंद्र गिरी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टेमसना येथे किसान गोष्टी कार्यक्रम संपन्न

कामठी ■ नंदू कोल्हे

कृषि विभागामार्फत शेतकरी हिताच्या भरपूर योजना राबविल्या जातात. शेतकऱ्यांनी त्या योजनांचा लाभ घेऊन आपली आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन नागपूर जिप च्या महिला व बालकल्याण सभापती प्रा. अवंतिका लेकुरवाळे यांनी केले. कृषि तंत्रज्ञान व्यस्थापन यंत्रणा (आत्मा) तसेच तालुका कृषि अधिकारी कामठी यांचे संयुक्त विद्यमाने, ग्रामपंचायत टेमसना, ता कामठी, जि नागपूर येथे, शुक्रवार दिनांक १२/१/२४ रोजी आयोजित किसान गोष्टी कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कामठी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिकेत शहाणे, प्रमुख पाहुणे म्हणून कामठी बाजार समितीचे संचालक सचिन घोडमारे, आडक्याचे सरपंच विजय खोडके, तरोडीच्या सरपंच आरती चिकटे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा रेशीम अधिकारी स्वप्निल तायडे, केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे विषय विशेषज्ञ डॉ सचिन वानखेडे, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेचे जिल्हा संसाधन व्यक्ति योगराज वाघमारे, हाईटेक ड्रोन सोलुशनचे निशांत गाढवे, नेटाफीम इरिगेशनचे लक्ष्मण घुगल उपस्थित होते.

प्रास्ताविक मंडळ कृषि अधिकारी सुहास अंबुलकर यांनी तर सूत्रसंचालन कृषि पर्यवेक्षक विलास गावंडे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कामठी बाजार समितीचे संचालक सचिन घोडमारे म्हणाले की, पदाधिकारी आणी अधिकारी/कर्मचारी यांनी आपसांत समन्वय साधून शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबवाव्या.

प्रमुख मार्गदर्शक डॉ सचिन वानखेडे यांनी सद्य हवामान परिस्थितीमध्ये गहु व हरभरा पिकाचे व्यवस्थापन, रेशीम अधिकारी स्वप्निल तायडे यांनी रेशीम उद्योग, योगराज वाघमारे यांनी पीएमएफएमई योजना, लक्ष्मण घुगल यांनी सूक्ष्म सिंचन या विषयांवर उपस्थित शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामपंचायतला लागून असलेल्या शेतात ड्रोन फवारणीचे प्रात्यक्षिक करून दाखविन्यांत आले.

अध्यक्षीय भाषणातून टेमसनाचे सरपंच तथा बाजार समिती सभापती अनिकेत शहाणे यांनी मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड तसेच रेशीम योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन याप्रसंगी केले. यावेळी ४ शेतकऱ्यांनी स्वेच्छने रेशीम उद्योग योजनेसाठी आपली नावे नोंदविली.

सदर किसान गोष्टी कार्यक्रमांत टेमसना, कुसुम्बी, आडका, पांढरकवडा, केम, तरोडी, परसोडी तथा परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कृषि अधिकारी सुहास अंबुलकर, कृषि पर्यवेक्षक विलास गावंडे, कृषि सहायक अश्वीनी साखरे, ज्ञानेश्वर मलेवार, कामठी आत्माचे नाशिक जांभुळकर, ग्रामपंचायत कर्मचारी संदीप वाघ, उमेश दुधपचारे आदींनी परिश्रम घेतले.

लोककला महोत्सवाला रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

लोहा ■ विश्वनाथ शिंदे



श्रीक्षेत्र माळेगाव- महाराष्ट्र राज्याच्या गौरवशाली परंपरेचे आणि लोककलेचे जतन करण्यासाठी व लोककलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेत आयोजीत पारंपारिक लोककला महोत्सवाला रसिक प्रेक्षकांना उदंड प्रतिसाद दिला.

नांदेड जिल्हा परिषद व लोहा पंचायत समितीच्या वतीने श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त आयोजित पारंपारिक लोककला महोत्सवाचे

उद्घाटन आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कामवार, चंद्रसेन पाटील, आनंदराव शिंदे, गट विकास अधिकारी आडेराघो आदींची उपस्थिती होती.

श्री खंडोबाच्या प्रतिमेचे पुजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा काठी आणि घोंगडी देवून सत्कार करण्यात आला. शाहीर प्रेमकुमार मस्के यांच्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कारभारी दमानं... होऊ द्या दमानं, बाई मी लाडाची... कैरी पाडाची.. विविध लावण्या, खंडोबा गीत, वेस्टर्न, ग्रुप डान्स सादर केले. पांडुरंग मुळे नारायणगावकर तमाशा मंडळ मांजरवाडी या संचाने सादर केलेल्या चंद्रा व बाई मी लाडाची ग कैरी पाढाची या लावणी सादरणार रसिक थिरकले. यावेळी आनंद लोकनाट्य मंडळानी विविध लावण्यासह झुमकावाली पोरं ... वन्स मोर ठरले. अजंली राजे नाशिककर, रघुवीर खेडकर, हिराभाऊ बडे व शिवकन्या बडे नगरकर लोकनाट्य तमाम मंडळ नगरकर यांच्यासह विविध जिल्यातील कलाकारांनी लोककला मंचावर सादर केलेल्या. बहारदार गीतांने यावेळी रसिकांची मने जिंकली.

अनेक जिवंत लोककलेचे बहुरंगी दर्शन यानिमित्त राज्याच्या रसिक प्रेक्षकांना मिळाले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील लाखो रसिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या वतीने स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन परशुराम कौशल्ये यांनी केले. सहाय्यक प्रशासन अधिकारी एस. डी. चोरमले, पी.एम. वाघमारे, विस्तार अधिकारी डी.आय. गायकवाड, धनंजय देशपांडे आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रेची वैभवशाली परंपरा आहे. यात्रेचे वैभव वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याने प्रतिसाद आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी केले.

रमेश गीरी जीवनगौरवाने सन्मानित

माळेगाव येथे पारंपरिक लोककला महोत्सवात नांदेड येथील शाहीर - हस्य सम्राट रमेश गीरी यांना आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे व पंचायत समितीचे सभापती आनंदराव शिंदे यांनी प्रत्येकी अकरा हजार रोख बक्षीस गीरी यांना दिले.

राजमाता जिजाऊ,स्वामी विवेकानंद यांचे विचार विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक :- खटावकर सर

मामला येते जन्मोत्सवानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप कार्यक्रम संपन्न

बीड ■ गितांजली लव्हाळे



छत्रपती शिवाजी महाराजांसारखे सुपुत्र घडवून आपल्या सर्वांगीण संस्काराने ज्या मातेने रयतेचे स्वराज्य ,साम्राज्य उभे केले अशा राष्ट्माता राजमाता जिजाऊ आईसाहेबांचे तसेच दैदिप्यमान व्यक्तिमत्व,अमोघ वाणी, ज्ञान,ध्यान साधनेने व विशेष लेखणीच्या सामर्थ्यावर जगाला आपली ओळख निर्माण करणारे स्वामी विवेकानंद आजच्या विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहेत. त्यांच्या प्रेरणेने यशाची शिखरे गाठावीत असे प्रतिपादन मुख्याध्यापक आसाराम खटावकर सर यांनी व्यक्त केले.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जन्मोत्सवानिमित्त मामला येथील शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ?ड.ज्ञानेश्वर लंगे यांच्या वतीने शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण साहित्य वाटप कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी सर्वप्रथम राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी विद्यार्थी विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार व्यक्त केले. तसेच शाळेतील मुख्याध्यापक आसाराम खटावकर सर यांनी विचार मांडताना म्हणाले की शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले या पाठीमागे खंबीर मार्गदर्शन शिकवण कुणाची असेल तर त्यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊंची आहे. सामान्यातील सामान्य आणि शिवबा समान मानून स्वराज्याची बांधणी जिजाऊंनी केली. आणि घराघरात आत्मविश्वास पेरण्याचे महाकार्य केले. तसेच अल्प आयुष्यात जगभर व्याख्याने प्रचंड लेखन यातून अध्यात्म विद्या प्रतिपादन करून स्वामीजींनी हिंदुस्तानच्या ज्ञान समृद्धीला झळाळी दिली असे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाप्रसंगी शिक्षण प्रेमी योगेश लंगे राजेभाऊ लंगे कृष्णा खळगे सखाराम मोरे सुनील लंगे आधी ग्रामस्थ उपस्थित होते शेवटी कार्यक्रमाचे आभार सहशिक्षक अर्जुन शिंदे सर यांनी मांनले.

सातारा येथे छ. संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन साजरा



सातारा ■ जीवन मोहिते

नाना नानी पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त त्यांच्या भव्य असणाऱ्या शिल्पास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रथमतः पालिकेच्यावतीने अधिकारी,पदाधिकारी व कर्मचारी यांनी भला मोठा पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.तदूनंतर रिपब्लिकन सेनेतर्फे जिल्हाध्यक्ष विशाल भोसले, श्रीमंत छ.उदयनराजे भोसले युवा मंच यांच्यावतीने सुनील लाड, निवास जाधव,गणेश कार्वे, सोमनाथ लाड,साई भिसे व सचिन चव्हाण यांनी अभिवादन केले.राष्ट्रोत्सव संयोजन समितीतर्फे ?ड.विलास वहागावकर,अनिल वीर,मोहन मोरे,सुरेश भोकरे,विनायक गोडबोले,सुनील भोजने, कैलास सोळंके,गोविंद मोहितें,जयवंतराव जाधव,संजय घाडगे आदी विविध क्षेत्रातील मान्यवर,सेवानिवृत्त कार्यकर्ते, नागरीक व छ. संभाजीराजे प्रेमींनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

अखिल भारतीय छावा संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी कृष्णा धोंडगे यांची निवड



चाकूर/लातूर ■ नवनाथ डिगोळे

अखिल भारतीय छावा संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी चाकूर येथील कृष्णा धोंडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लातूर येथील शासकीय विश्रामगृह येथे विद्यार्थी आघाडीचे प्रदेश अध्यक्ष विजकुमार घाडगे पाटील व जिल्हा अध्यक्ष दीपक नरवडे यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली आहे.

यावेळी वैभव धोंडगे, विष्णू फरकांडे, अविनाश भोरे, आशुतोष धोंडगे, कपिल पाटील व आदी उपस्थित होते. सतत समाज हितासाठी तत्पर असणारे कृष्णा धोंडगे यांची कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने कौतुक होत आहे.

झोपडपट्टी धारकांच्या न्याय हक्कासाठी डॉ.भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा संपन्न



सातारा ■ जीवन मोहिते

माजगावकर आकाशवाणी झोपडपट्टीधारक यांच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी निघणाऱ्या मोर्चाचे नेतृत्व डॉ.भारत पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

सातारा शहरातील माजगावकर माळ व आकाशवाणी झोपडपट्टीधारक यांच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी व हक्काचे मोफत घर मिळावे. यासाठी झोपडपट्टीधारकांचा मोर्चा आयोजित केला होता.

कष्टकरी जनतेचे नेते डॉ.भारत पाटणकर यांच्या समवेत महिला,पुरुष,आबालवृद्ध आदी शेकडो कार्यकर्ते यांच्यासह ?ड, मिलिंद पवार, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव गणेश भिसे,जिल्हा उपाध्यक्ष संदिप कांबळे,शहराध्यक्ष मिलिंद (भाऊ) कांबळे,मुक्ती संघर्षचे नेते संग्राम सावंत ,लाल निशाण पक्षाचे अतुल दिघे,आरपीआय कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा समन्वयक गणेश वाघमारे , सचिन कांबळे,सामाजिक कार्यकर्ते अनिल वीर आदी विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.असंख्य स्त्री पुरुष व नागरिकांनी मोर्चात सहभागी होऊन घोषणांनी शहर दणाणून सोडले होते.

मोर्चाचा मार्ग हा आकाशवाणी झोपडपट्टी पासून सुरुवात होवुन बुधवार नाका - बारटक्के चौक - ५०१ पाटी - खालचा रोड मार्गे - पोवई नाका व जिल्हाधिकारी कार्यालय असा होता.सरतेशेवटी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ.पाटणकर यांनी आंदोलनकर्त्यासमोर मार्गदर्शन केले.शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले.

एमपीएससी मार्फतच घ्याव्यात स्पर्धा परीक्षा; छत्रपती संभाजीनगरात विद्यार्थ्यांचा एल्गार

दै, जनप्रभात छ.संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी ■ मोहन आखाडे



तलाठी भरतीसह वेगवेगळ्या नोकर भरती परीक्षा तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती फेलोशिप पात्रता परीक्षांत पेपर फुटी प्रकरणांमुळे दहा-दहा तास अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. त्या प्रकरणाची चौकशी 'एसआयटी'मार्फत करावी व यापुढे सर्व स्पर्धा परीक्षा खाजगी संस्थांऐवजी 'एमपीएससी'च्या मार्फतच घ्याव्यात, असा एल्गार संतप्त विद्यार्थ्यांनी मंगळवारी क्रांतीचौकात पुकारला.

विद्यार्थी कृती समितीच्या वतीने स्पर्धा परीक्षांत होणाऱ्या पेपर फुटी प्रकरणाच्या विरोधात ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात स्पर्धा परीक्षांची तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती फेलोशिप पात्रता परीक्षांची तयारी करणारे हजारो विद्यार्थी सकाळी साडेअकरा वाजेपासून जमा झाले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या संतप्त भावना मांडल्या. तलाठी स्पर्धा परीक्षा पेपर फुटी प्रकरणाची 'एसआयटी'मार्फत चौकशी करुन शासनाने दोषींना स्पर्धा परीक्षा प्रक्रियेतून आजन्म हद्दपार करावे, असा सूर या आंदोलनात निघाला. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी, शेतमजुरांची मुलं स्पर्धा परीक्षेची दहा- दहा तास अभ्यास करीत आहेत. मात्र, ऐन परीक्षांमध्ये काही मंडळी पेपर फोडतात. पैसे घेऊन नोकरी लावण्याचे आमिष दाखवतात, याचा शासनाने शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करावी. मागील पाच- सात वर्षांपासून नोकरीच्या अपेक्षेत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा परीक्षांतील घोटाळ्यामुळे भ्रनिराश होत आहे. अनेकांचे आई- वडिला आपल्या मुलाच्या भवितव्याकडे आस लावून बसले आहेत, त्यांना न्याय मिळण्यासाठी परीक्षा घोटाळे करणाऱ्या समाजकंटकांविरूद्ध शासनाने कठोर पाऊले उचलावीत, दरवर्षी भरती प्रक्रिया राबवावी, फेलोशिपचा पेपर का व कोणी फोडला, याचे स्पष्टीकरण शासनाने द्यावे, अशा भावना विद्यार्थी नेते प्रकाश उजगरे, राहुल मकासरे, सिद्धार्थ पानबुडे, सचिन वाघमारे, धम्मा मिसाळ, चंचल जगताप, दीपाली पाटील, किरण अंभोरे, आदींनी मांडली.यावेळी प्रा. विठ्ठल कांगणे व बाळासाहेब शिंदे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी तलाठी पेपर फुटी प्रकरणाची चौकशी 'एसआयटी'मार्फत चौकशी करावी, ही परीक्षा 'एमपीएससी'द्वारे घेऊन महिनाभराच्या आत निकाल जाहीर करावा व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते भव्य पशू, अश्व ,श्वान , कुकुट प्रदर्शन व विविध स्पर्धांचे उद्घाटन संपन्न

लोहा ■ विश्वनाथ शिंदे



माळेगावः- दक्षिण भारतातील सुप्रसिद्ध असलेल्या श्री. क्षेत्र खंडोबा रायाच्या यात्रेला काल दिनांक १० जानेवारी रोजी भक्तिमय वातावरणात व उत्साहात प्रारंभ प्रारंभ झाला असून काल गुरुवारी माळेगाव यात्रा येथे भव्य पशू, अश्व, श्वान, कुकुटप्रदर्शन व विविध स्पर्धांचे उद्घाटन लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, सहायक पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी माळोदे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त राजकुमार पडिले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी भूपेंद्र बोधनकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, लोह्याचे तहसीलदार शंकर लाड, सहाय्यक आयुक्त डॉक्टर घुले, नायब तहसीलदार अशोक मोकले, कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा युवा नेते रोहित पाटील शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक चंद्रसेन पाटील, खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार, सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर , शेकाप तालुका अध्यक्ष नागेश हिलाल ,सचिन कुदळकर , डॉ. पुरी ,राम पाटील, सतीश कराळे, राहुल पाटील, विश्वंभर आडगावकर सह सर्व विभागाचे अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते, या भव्य पशू, अश्व , श्वान, कुकुट प्रदर्शन व विविध स्पर्धाचे उद्घाटन आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाल्यानंतर आमदार श्यामसुंदर शिंदे बोलताना म्हणाले की लोहा कंधार मतदारसंघातील गऊळ येथील लाल कंधारी संवर्धन केंद्र बीड जिल्ह्यात हलवण्याचा घाट घातला असता हिवाळी अधिवेशनात लाल कंधारी पशुसंवर्धन केंद्र कंधार तालुक्यातील गऊळ येथेच कायमस्वरूपी राहण्यासाठी मी हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता,व कोणत्याही परिस्थितीत माझ्या मतदारसंघातील लाल कंधारी संवर्धन केंद्र बाहेरच्या जिल्ह्यात जाऊ देणार नसून माझ्या मतदारसंघातील लाल कंधारी गाय व वळू पशुपालकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असल्याचे यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले. यावेळी आमदार शिंदे यांनी माळेगाव यात्रेचे नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने उत्तम व पारदर्शक नियोजन केल्याबद्दल यात्रेला येणाऱ्या लाखो भाविक भक्तांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल व जिल्हा परिषद नांदेडच्या सर्व टीमचे आमदार शिंदे यांनी अभिनंदन व कौतुक केले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमाअंतर्गत बी के डी शाळेत प्रोत्साहन पर कार्यक्रमः१०० गडकिल्ले पार करणारी गिर्यारोहक शर्विका म्हात्रे चा सत्कार

चाकूर/लातूर ■ नवनाथ डिगोळे



चाकूर शहरातील उपक्रमशील विद्यालय म्हणून ओळख असलेल्या भाई किशनराव देशमुख माध्यमिक विद्यालयात काल मार्गदर्शन कार्यक्रम व सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित केला होता.'मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या उपक्रमाअंतर्गत मकरसंक्रांती निमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमानिमित्त शंभर गडकिल्ले पार करणारी गिर्यारोहक शर्विका म्हात्रे हिचा सत्काराचा आयोजन करण्यात आले होते.विद्यालयातील प्रांगणात सदरील कार्यक्रम आयोजित केला होता.

सर्वप्रथम प्रमुख मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमांस अध्यक्षा म्हणून माहेश्वरी पाटील, उदघाटक म्हणून ?ड. पी. डी कदम,अनिताताई वलांडे,तर प्रमुख पाहुणे म्हणून रामेश्वर पाटील, सज्जनकुमार लोणावळे, कपिल माकणे,अरविंद बिराजदार,नितीन रेड्डी,विजय बेलूरे,अजित पाटील कव्हेकर उपस्थित होते.उपस्थिती सर्व मान्यवरांचे पुष्प,शाल देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमांस विशेष मार्गदर्शनासाठी आलेल्यांचा सर्वप्रथम मार्गदर्शन झाले.यामध्ये प्रामुख्याने बसवराज कोरे ज्येष्ठ साहित्यिक जालना व कवयित्री अनिताताई वलांडे यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील गडकिल्ले, त्यांचा इतिहास व इतर विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.गडकिल्ले संवर्धन व गडकिल्ल्यांचे महत्व याबद्दल उपस्थितांचे त्यांनी लक्ष वेधले.उपस्थित मान्यवर यांनी सुद्धा मार्गदर्शन करून गिर्यारोहक शर्विका चे अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी शंभर गडकिल्ले पार करणारी गिर्यारोहक चिमुकली शर्विका म्हात्रे हिचा सर्व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.शर्विका चे करावे तितके कौतुक कमीच आहे,तिच्याकडून प्रेरणा घेण्यासारखी बाब असल्याचे कार्यक्रमाच्या अध्यक्षा माहेश्वरी पाटील यांनी अध्यक्षीय समारोपात वक्तव्य केले.विद्यालयच्या मुख्याध्यापिका पवार मॅडम यांनी सुद्धा शर्विका फक्त सहा वर्षाची असून एवढ्या कमी वयात शंभर गडकिल्ले पार करणे सोपी गोष्ट नाही.तिच्या धाडसचे कौतुक केले पाहिजे,तिच्या आई-वडिलांचेही त्यांनी प्रसंगी बोलताना अभिनंदन व कौतुक केले.कार्यक्रमाचे आभार एडले सर यांनी तर सूत्रसंचालन नलमले सर यांनी केले.

कांद्री नगर पंचायत अंतर्गत नववर्ष व मकरसंक्राती पर्वा निमित्त आयोजित भव्य दुय्यम खडा तमाशा कार्यक्रमाला माजी मंत्री श्री राजेंद्रजी मुळक यांची उपस्थिती

रामटेक ■ जयश्री मेंघरे



आज दिनांक १५/०१/२०२४ रोज सोमवार ला परशिवणी तालुका अंतर्गत कांद्री (कन्हान) येथे 'महादेव पंच कमिटी' तर्फे नववर्ष व मकरसंक्राती पर्वा निमित्त खदान रोड, हनुमान मंदिर गांधी चौक, कांद्री येथे आयोजित दुय्यम खडा तमाशा तसेच दत्त मंदिर, बस स्टॉप रोड, कांद्री येथील आयोजित भव्य दुय्यम खडा तमाशा कार्यक्रमाला मा.श्री. राजेंद्रजी मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) यांनी भेट दिली तसेच या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्त्री शिक्षण, हुंडा बडी व स्वच्छ ग्राम - निरोगी ग्राम इत्यादी जनजागृती संदेश जन-सामान्य पर्यंत पोहचविण्याचे काम केले जाते असे विचार आपल्या संभाषणातून व्यक्त केले.

या प्रसंगी श्री. दयारामजी भोयर (अध्यक्ष, पार. ता.कॉं.क), श्री. बळवंतजी पडोळे (माजी सरपंच कांद्री ग्रा.प), श्री. प्रमोदजी कावळे, श्री. ओमप्रकाशजी भोयर (अध्यक्ष,कांद्री शहर कॉं.क), श्री. प्रकाशजी चाफले , श्री. धनराजजी कारेमोरे, श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे, श्री. बैसाखु जनबंधू, श्री. सतीश घारड, श्री. केशवरावजी मस्के, श्री. इंद्रपालजी वंजारी, श्री. नरेशजी कामडे, श्री. गजाननजी आकरे, श्री. मनोजजी बावनकुळे, श्री. विक्रमजी वांढरे, श्री. प्रहलादजी वाघमारे, श्री. नामदेवजी दौलतकर, श्री. कैलाशजी वाडीभस्मे, श्री. मधुकरजी पंडित, श्री. नामदेवजी कामडे, श्री. गजाननजी वडे, श्री. गणेशजी सरोदे, श्री. अभयजी जमुदकर, श्री. कार्तिक थोटे, श्री. संदीपजी रहांडले, श्री. राजेशजी आकरे, श्री. रवींद्रजी सावरकर इत्यादी मान्यवर व ग्रामवासी गण उपस्थित होते.

विद्यापीठ नामांतर लढा भिमसैनिकांचे स्फूलींग चेतविणारा - डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी

दै, जनप्रभात अहमदपूरचे तालुका प्रतिनिधी ■ सचिन नागनाथ बानाटे



अहमदपूर : मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा हा स्वाभिमानाचा,अस्मितेचा लढा होता या लढ्यात भिमसैनिकांनी दाखवलेले धैर्य आणी प्रसंगी जीवाचे बलीदान देवून दिलेला निकराचा लढा हा ऐतिहासिक अशा स्वरूपाचा असून अन्याय अत्याचाराच्या विरोधात काम करणाऱ्यांसाठी हा लढा स्फूलींग चेतविणारा ठरला आहे असे प्रतिपादन युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.

शहरातील शहिद गौतम वाघमारे चौक येथे विद्यापीठ नामविस्तार दिन व अभिवादन कार्यक्रमात ते अध्यक्षपदा वरून बोलत होते.कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर,माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बाबासाहेब वाघमारे, पत्रकार शिवाजीराव गायकवाड,भिमराव कांबळे,सय्यद अनवर, सय्यद मूज्जमील, आसीफखान पठाण, बालाजी कांबळे,गणेशराव मूंडे,राजू पाटील,हरिभाऊ गूट्टे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सुरूवातीला धम्म ध्वजारोहन सरस्वतीबाई कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच सामूहिक त्री शरण पंचशिलाचे पठण करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी म्हणाले की,तब्बल सोळा वर्षाचा निकराचा लढा भिमसैनिकांनी देवून प्रसंगी जीवाचे बलीदान दिले तेंव्हा कूठे विद्यापीठाला बाबासाहेब आंबेडकर यांचा नांव देण्यात आले.सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून गौरवीत व्यक्तीचे नांव विद्यापीठाला देण्यासाठी केवळ जातीचा अडसर होता हे वारंवार सिध्द झाले.यातून प्रस्थापितांची जातीय मानसिकता दिसून येते.पण आज देशभरात चार पाच डझन विद्यापीठ आणी संस्थांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव आहे.बाबासाहेबांच्या नावामूळे विद्यापीठांचा आणी संस्थांचा गौरव वाढला आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक स्वागताध्यक्ष बाबासाहेब वाघमारे यांनी केले.तर आभार सूमीत बनसोडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी बनसोडे,सचिन बानाटे, संविधान कदम,अभय गायकवाड,जय गूळवे, रोहिदास तिगोटे, सतीश कदम,सूरेश कांबळे,अनिल तिगोटे,कोमेश सोनकांबळे, दिलीप सोनकांबळे,आकाश वाघमारे,बापू वाघमारे, सूनिल ससाणे आदींनी पुढाकार घेतला.

लाचखोर लिपीक एसीबीच्या जाळयात उर्ध्व पैनगंगा प्रकल्प सिंचन विभागातील प्रकार : १५०० रू. घेतांना अटक

दै, जनप्रभातचे ढानकी सर्कल प्रतिनिधी ■ गायकवाड सीमा तानाजी



यवतमाळ : उमरखेड येथील उर्ध्व पैनगंगा प्रकल्प सिंचन विभागांमध्ये कर्मचारी असणारा सचिन मुटकळे या कर्मचाऱ्याला केवळ रुपयाची लाच घेताना यवतमाळच्या लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांयकाळच्या सुमारास रंगेहात पकडले. दरम्यान त्यानंतर सदर कर्मचाऱ्यांच्या घराची झडती घेण्यात आली. उमरखेड येथे उर्ध्व पैनगंगा प्रकल्प सिंचन विभागाचा कर्मचारी सचिन मुटकळे याच्याकडे शेतकऱ्यांना त्याचे शेतीक्षेत्र लाभक्षेत्रात येते किंवा नाही

याबाबतचे प्रमाणपत्र देण्याचे काम आहे यासाठीच एका शेतकऱ्याने लाभक्षेत्रात जमीन येत नसल्याचे प्रमाणपत्र मागितले हे प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित शेतकऱ्याला दीड हजाराची लाच मागणी करण्यात आली त्याने यवतमाळ येथील लाच लुचपत खात्याकडे तक्रार नोंदविली यवतमाळच्या एसीबीने सापळा रचुन त्याला पाच वाजताच्या दरम्यान लाच स्वीकारताना रंगेहात या पकडले.

दस्तऐवजाची तपासणी या अधिकाऱ्यांनी नंतर कार्यालयातील काही फाईली तपासल्या नंतर त्या लाचखोर कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन तपासणी केली मात्र यात एसीबीच्या अधिकाऱ्यांना काय हाती लागली याबाबत मोठी गोपनीयता ठेवण्यात आली आहे मात्र या संदर्भात उमरखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहमदपूर चाकूर तालूक्यातील शेतकऱ्यांचा प्रलंबीत ३० कोटी ६३ लाख रूपये तुर पिक विमा अथक प्रयत्नातून मंजूर: माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांची माहिती

दै, जनप्रभात अहमदपूरचे तालुका प्रतिनिधी ■ सचिन नागनाथ बानाटे



अहमदपूर अहमदपूर व चाकूर तालुक्यातील सन २०२२ चा प्रलंबित असणारा तुर पिक विमा हा अथक प्रयत्नातून मंजूर करून आणला असून शेतकऱ्यांच्या खात्यावर हा विमा पाठविण्यात असल्याची माहिती माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

अहमदपूर व चाकूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तुर पिकासाठी विमा भरला होता. मात्र वारंवार तांत्रिक कारणे सांगून कंपनीने हा पिक विमा देण्याचे टाळले होते.या बाबत असंख्य शेतकऱ्यांनी माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांच्याकडे कैफियत मांडली होती.त्या नूसार गेल्या वर्ष भरापासून महिन्यापासून मंत्रालय ते जिल्हा स्तरापर्यंत या संदर्भामध्ये पाठपुरावा केला होता.प्रामुख्याने याबाबत राज्याचे कृषी आयुक्त,कृषि सहसंचालक(विस्तार व सांख्यिकी),जिल्हाधिकारी कार्यालय तसेच विमा कंपनीचे अधिकारी यांच्या भेटी घेऊन या संदर्भामध्ये वेळोवेळी निवेदन देऊन पाठपुरावा केला होता. अहमदपूर विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात तुर पिकाचे उत्पन्न घेतले जाते. त्या पिकावर पिक विमा योजनेतून विमा उतरविला जातो.विमा योजनेतील अटी व शर्तीनुसार पीक कापणी प्रयोग झाल्यानंतर तीन आठवड्यामध्ये विमा देणे अपेक्षित असताना सुद्धा विमा कंपनीमार्फत तांत्रिक त्रुटीवर बोट ठेवून जाणीवपूर्वक विलंब केला होता.प्रामुख्याने तूर पिक सलग पीक धरणे बाबत आदेश पारित झाले असताना सुद्धा विमा कंपनी नुकसान भरपाई चाल ढकल करीत होती.ही बाब माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथरावजी शिंदे,उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार,कृषी मंत्री ना.धनंजयजी मुंडे, तत्कालीन कृषी आयुक्त, तत्कालीन जिल्हाधिकारी,कृषि अधिक्षक लातूर, कृषी सहसंचालक (विस्तार सांख्यिकी)पूणे या सर्वांकडे वारंवार पाठपुरावा केला होता.

त्यामुळे अहमदपूर तालुक्यातील २८ हजार ८ ४९ शेतकऱ्यांना २२ कोटी २६ लाख ८७ हजार २२८ रुपये तर चाकूर तालुक्यातील १२८०० शेतकऱ्यांना ८ कोटी ३६ लाख ४६००० एवढा पिक विमा मंजूर झाला असून सदर तुर पिक विमा ५ जानेवारी २०२४ पासून बँकेत जमा होण्यास सुरुवात झाली आहे.हा प्राप्त झालेला व अप्राप्त असलेला तुर पिक विमा पुढील पाच-सहा दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असल्याची माहिती मतदारसंघाचे माजी आमदार तथा या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणारे बब्रवानजी खंदाडे यांनी एका प्रसिद्धीपत्रकांवर माहिती दिलेली आहे.

तळेगाव चौक येथे संघर्ष ग्रुप कडून रास्ता रोको आंदोलन

दै, जनप्रभात पिंपरी चिंचवड शहर प्रतिनिधी ■ गोरक्ष मदने



केंद्र सरकारने जो हीट अँड रन कायदा लागू करण्याचे ठरवले आहे तो कायदा प्रामाणिक व्यावसायिक वाहन चालकावर अन्यायकारक असाच दिसतो आहे ,

करिता सदरील कायद्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी केंद्र सरकारने वाहन चालक सुरक्षा कायदा अमलात आणून वाहन चालक यांच्या कौटुंबिक तसेच आर्थिक परिस्थितीचा विचार करून नवीन कायद्याची अंमलबजावणी करावी व नंतर या कायद्यात सुधारणा करून मगच हा कायदा अमलात आणावा असे सांगण्यात आले,

गेली अनेक वर्ष वाहन चालक आर्थिक महामंडळ तसेच ड्रायव्हर सुरक्षा कायदा यासाठी सरकारला जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्थेच्या वतीने निवेदन तसेच मोर्चे आंदोलने करत आहे त्याकडे लक्ष न देता जाणीवपूर्वक केंद्र सरकारने हा काळा कायदा अमलात आणून २५ कोटी वाहन चालकांवर अन्याय केल्याचे दिसते आहे,

त्यामुळेच राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संघर्ष ग्रुप प्रदेशाध्यक्ष अवजड विभाग श्री गोरक्ष मदने यांच्या नेतृत्वात तळेगाव चौक येथे रास्ता रोको आंदोलन करुन सरकार विरोधात काळे झेंडे दाखवण्यात आले,

हिट अँड रन कायदा रद्द करावा, वाहन चालक सुरक्षा कायदा अमलात आणावा, वाहन चालकांसाठी आर्थिक महामंडळ स्थापन करावे अशा अनेक मागण्या घेऊन हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले,

याआंदोलनात मयूर फिरके,चेतन इंगळे, काकासाहेब गंभीरे ,नारायण सोनवणे, बाबासाहेब तांदळे ,नारायण भिंताडे, अविनाश खरगे ,विनोद मोटे, राजू उबाळे, सुंदर सावंत ,बाबासाहेब हाके, संदीप देशमुख ,दत्ता वाघमोडे, मोतीलाल सोनवणे, सचिन बोगे ,अमित टिळेकर ,स्वानंद पवार, अमर देशमुख ,भरत महानवर,गणेश फापाळे ,महादेव शेवाळे ,संदीप गारुडी वशिष्ठ माने ,अमर दळवी ,मौला शेख, बापू थोरात ,अविनाश वीर ,गौतम जाधव ,संदीप सावंत ,रुपेश खंडागळे, बंटी मोठे ,मनोज गायकवाड, बडे साहेब, संतोष जाधव ,संदीप खारकर विशाल शेवाळे , दिवाकर आल्हाट, युवराज जाधव अन्य वाहनचालक उपस्थित होते,

सहश्रकुंड येथे मकरसंक्रांत निमित्ताने यात्रा चे आयोजन



सहश्रकुंड ■ लखन जाधव

किनवट तालुक्यातील सहश्रकुंड येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी मकरसंक्रांत सणानिमित्ताने यात्रा चे आयोजन करण्यात आले होते यावेळी या यात्रा ला परिसरातील हजारो लोक यात्रा ला येतात सहश्रकुंड धबधबा हा चार राज्यात प्रसिद्ध आहे येथे पर्यटक ला पाहण्यासाठी आकर्षित गार्डन आहे यात्रा दरवर्षी मकरसंक्रांत निमित्ताने यात्रा भरली जाते या यात्रेत हजारो लोक परिसरातील अनेक गावातील लोक या यात्रेला येतात.

लग्न आल की वाजवायला रयत क्रांती संघटना भाजप चा बँडवाला नाही - राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांची महायुतीवर नाराजी

बीड ■ गितांजली लव्हाळे



नुकत्याच बीड येथे झालेल्या महायुतीच्या पहिल्याच मेळाव्यावर घटक पक्ष असलेले रयत क्रांती संघटना तथा पक्षाचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हा अध्यक्ष शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.

२०१४ पासून आम्ही सोबत आहोत .२०१९ साली सरकार गेल्यानंतर घटक पक्ष असलेली रयत क्रांती संघटना कुठेही गेली नाही एवढेच नाही तर भाजपा ऐवजी रयत क्रांती संघटना रस्त्यावरची लढाई लढत राहिली. महविकास आघाडी सरकारच्या विरोधात रस्त्यावर लढलो. अंगावर केसेस घेतल्या.

महायुतीत बेरजेच्या राजकारणात मोठे प्रस्थापित पक्ष असतील मात्र आम्ही ही जुने घटक पक्ष आहोत ज्यांच्या स्वागतासाठी तुम्ही फुलाच्या पायघड्या घालत आहेत त्या प्रत्येक फुलाची पाखळी आम्ही जोडली आहे. सत्तेत नसताना रस्त्यावरची लढाई आम्ही उभी करतो. आमची लढाई वाडा विरुद्ध गावगाडा अशी आहे.प्रस्थापित विरुद्ध विस्थापितांची बाजू मांडणारे आहोत आमचा संपर्क गावोगावी खेडोपाडी आहे. ए सी मध्ये बसून गप्पा मारणारे कार्यकर्ते आम्ही नाहीतर आम्ही प्रवाहाच्या विरोधात काम करणारी माणसे आहोत.

बऱ्याच वेळा असं होत की म्हातारपण आल की माणसाला सगळ आठवायला लागत, अगदी तसच निवडणुका आल्या की भाजप ला मित्र पक्षाची आठवत आली. अशावेळी महायुतीच्या बॅनरवर आमच्या नेत्याचा फोटो टाकून जो मान दिलाय तेवढच आमचं भाग्य समजावं का असा प्रश्न संदिप वाहुळे यांनी विचारला आहे. तुमच्या शेतात निवडणुकीच पीक आले आहे आता तन काढायची वेळ झालीय, तेव्हा आता आमची आठवण आली. आम्ही पण विळा खुरप घेऊ आलोय. पण पण लक्षात ठेवा तन काढणारा उपाशी राहता कामा नये.

महायूतीच्या पक्षाची बैठक बीड जिल्ह्यात पहिल्यांदा बोलावली नेत्यांचे बॅनरवर नाव आणि फोटो टाकले मात्र बऱ्याच घटक पक्षांच्या जिल्हा अध्यक्षांना तथा पदाधिकाऱ्यांना साधा संपर्क सुद्धा केला नाही.ही शोकांतिका आहे. सरकार आल्यापासून घटक पक्षांना कोणती जबाबदारी नाही किंवा कोणता निधी नाही. अशा वेळी कार्यकर्ते तुमचे काम करतील अशी अपेक्षा कशी ठेवता. तुमच्या बेरजेच्या राजकारणात घटक पक्षांना यथोचित सन्मान दिला नाही तर दर मतदार संघात किमान एक एक लाखाच नुकसान होणार हे नक्की. असे होऊ नये म्हणून घटक पक्षांना सन्मान द्यावा आणि विश्वासात घ्यावे असे मत व्यक्त केले. देशात रामराज्य आणायचे असेल ते फक्त मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी हेच आणू शकतात म्हणून आम्ही तुमच्यासोबत आहोत.

निवडणुका आली की आम्हाला सांगता कामाला लागा, योजना पोहोचवा, कार्यक्रम राबवा, प्रचार जोरात करा. आम्ही तुमचा लग्नाचा सिझन आला की वाजवायला तुमचे बँडवाले आहोत का ?घटक पक्षांना गरज पडेल तेव्हा गोळा करायला आणि काम झालं की टाकून द्यायला ढोल, ताशा, पिपाणी, खुळखुळ समजले आहे का असा संतप्त सवाल संदिप वाहुळे यांनी विचारला आहे.बीड जिल्ह्यात रयत क्रांती संघटनेची अकरा तालुक्यात बॉडी आणि गावोगाव शाखा तथा कार्यकर्ते आहेत. मा. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याच्या विचाराने अम्ही तुमच्या खांद्याला खांदा लावून उभे आहोत. अशा वेळी घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांना तुम्ही उचित सन्मान द्यावा ही अपेक्षा असते. तुमच्याकडून ना यथोचित सन्मान ना संधी असे असताना फक्त म्हणायला महायुती असे चालणार नाही असे सुनावले. संघटनेची ताकद जिल्ह्यात कमी समजू नये. तसे असेल तर मुंगी आणि हत्तीची गोष्ट आठवावी असा इशारा संदिप वाहुळे यांनी दिला.

आम्ही प्रवाहाच्या विरोधात काम करणारी माणसे आहोत. तुम्हाला आम्हाला डावलून चालणार नाही.अन्यथा आम्हाला विचार करावा लागेल कारण आमची लढाई वाडा विरुद्ध गावगाडा आहे. आम्ही शेतकरी, मजूर कामगार , विद्यार्थी, विस्थापित यांच्या साठी लढत आहोत.आम्हाला डावलून चालणार नाही असे स्पष्ट केले.

वाळू तस्करांचा एसडीओ यांच्यावर हल्ला; वाळू भरलेली सात ट्रक केली जप्त आरोपींना अटक

रामटेक ■ जयश्री मेंघरे



रामटेकः- रामटेकच्या उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांच्या नेतृत्वात अधिकारी व कर्मचारी तुमसर रामटेक मार्गाने वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करून सात वाहनांवर जप्तीची कार्यवाही केली. याच वेळी ओव्हरलोड रेती वाहतूक करीत असलेला ट्रक हा भरदाव घोटीटोक मार्गे काचूरवाही रस्त्याने निघाला .या वाहनाचा एसडीओ वंदना सवरंगपते यांनी आपल्या वाहनाने पाठलाग केला. मात्र मध्येच हिरव्या रंगाची नॅनो कार मध्येच आली. एसडीओ यांच्या वाहनाजवळ येत हातोडा व अन्य साहित्य फेकून हल्ला करण्यात आला. अनपेक्षितपणे घडलेल्या या प्रकाराने एसडीओ यांना वाहन ताब्यात घेता आले नाही. ट्रक आणि नैनोतील आरोपी पळून गेले या घटनेनंतर नायब तहसीलदार भोजराज बडवाईक यांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे फिर्याद नोंदविली. पोलिसांनी याबाबत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करीत संबंधित वाहनाच्या आरोपीला अटक केली असल्याची माहिती एसडीओ वंदना सवरंगपते यांनी दिली. शासनाची सर्वतोपरी वाळू चोरी वर शिकंजा लावणी सुरूच असताना आता अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करून घाबराविण्याचे प्रयत्न सुरू आहे. रामटेक तुमसर मार्गावरही अशीच काहीशी घटना घडली. कारवाईसाठी गेलेल्या महिला एसडीओ यांचेवर बेदकारपणे हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला .एसडीओ वंदना सवरंगपते थोडक्यात बचावल्या. दरम्यान महसूल विभागाने कारवाई करीत वाळू भरलेले सात ट्रक जप्त केले . तुमसर तालुक्यातील रेती घेऊन येणारे ओव्हरलोड ट्रक मोठ्या संख्येने रामटेक तालुक्यातील मार्गाने धावतात ते रोखण्यासाठी महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी आणि पोलीस तैनात करण्यात आले आहे. वाळू तस्करी होत असल्याची माहिती मिळाल्यावर रामटेकच्या उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांनी कारवाईसाठी दोन पथके तयार केली असून त्या प्रत्यक्ष कारवाईसाठी पोहोचल्या होत्या.

मा.श्री.राजेंद्रजी मुळक यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत रामटेक तालुक्यातील ग्रामपंचायत काचुरवाही येथील असंख्य शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

रामटेक ■ जयश्री मेंघरे



आज दिनांक १५/०१/२०२४ रोज सोमवरला रामटेक तालुक्याअंतर्गत मौजा काचुरवाही येथील असंख्य शिवसैनिकांनी रामटेक येथील जनसंपर्क कार्यालयात मा.श्री.राजेंद्रजी मुळक (माजी मंत्री तथा अध्यक्ष नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी) यांच्या कुशल नेतृत्वावर विश्वास ठेवून काँग्रेस पक्षात अधिकृतपणे प्रवेश घेतला.

अलीकडच्या काळात काँग्रेस पक्षाची वाढती लोकप्रियता आणि मा.श्री राजेंद्रजी मुळक यांचे नेतृत्व, संघटन कौशल्य आणि काम पाहून तालुक्यात काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

आगामी काळात काँग्रेस पक्ष मोठी उभारी घेऊन देशातील नंबर एकचा पक्ष होईल या विश्वासाने पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्व पदाधीकारी तसेच कार्यकर्त्यांचे यावेळी मा.श्री.राजेंद्रजी मुळक यांनी स्वागत केले तसेच सर्व कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना प्रत्येक अडचणीत संपूर्ण शक्तीने मदत करण्याचे वचन देत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या..

यावेळी श्री.सुनील डोकरीमारे,श्री.प्रफुल पानतावणे,श्री.नरेंद्र सहारे, श्री.राजेंद्र सोमनाथे,श्री.कपिल वासनिक, श्री.राजू सहारे, श्री.बंडू धुर्वे, श्री.जितेंद्र गोल्लर, श्री.श्रीकांत गायधने, श्री.गजानन मेश्राम, श्री.किशोर कुंभरे, श्री.महेंद्र नारायणबन्सी, श्री.रामेश्वर साकोरे,श्री.किसना मोहनकर, श्री.सुरेंद्र सहारे, श्री.पितांबर पानतावने, श्री भारत गाडवे, सौ.उज्वला पानतावणे, सौ.रुपाली गायकवाड, सौ.किरण पानतावणे, सौ.निर्मला नाटकर,सौ.वैशाली ऊके, सौ.शारदा देशमुख, श्री.केवल खेरगडे, श्री.जगन गायकवाड, श्री.सौरभ चन्ने,श्री.सुनील सोनवणे, श्री.जयेंद्र मोहनकर,श्री.रमण मोहनकर, श्री.विक्की ऊईके, श्री.नितेश तुमडाम, श्री.राहुल तुमडाम, श्री.रवींद्र बागडे,श्री.दिनेश सहारे,श्री.शंकर कोळवते,श्री.महेंद्र नाटकर, श्री.आशिष पोटभरे,श्री.विजय हरणे, श्री.अरुण चाचेरे, श्री.इंद्रपाल हुड, श्री.अतुल मोहनकर, श्री.दाजीबा गायकवाड, श्री.उदयभान चाचेरे,श्री.अनुप नाटकर, श्री.अर्जुन नाटकर,श्री.भीमराव गायकवाड, श्री.लक्ष्मण मोहनकर, श्री.गणेश आयके, श्री.जयंत पानतावणे, श्री.विकी पानतावणे, श्री.रोशन पानतावणे, श्री.मधु गायधने, श्री.सखाराम नाटकर, श्री भारत देशमुख,श्री.शरद मोहनकार, श्री.नरेश नाटकर, श्री.गुंडेराव नाटकर, श्री.गोपीचंद भिलकर,श्री.रमेश बावनकुळे,श्री.दुधराम बावनकुळे, श्री.मनोज गुरुभेले, इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी गण उपस्थित होते

रौप्य वर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'क्रीड़ा महोत्सवाचे थाटात उद्घाटन राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विद्यापीठाचे भव्य आयोजन

रामटेक ■ जयश्री मेंघरे



नागपूरः- राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विद्यापीठ द्वारा आयोजित रौप्य वर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'क्रीड़ा महोत्सवाचा' पहिला दिवस पार पडला. १२ ते १६ जानेवारी २०२४ दरम्यान विद्यापीठ क्रीड़ा परिसर , रविनगर, नागपुर येथे स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.रौप्य वर्षीय महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'क्रीड़ा महोत्सवाचे थाटात उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, कार्यक्रमाचे उद्घाटक सुवर्णपदक विजेता खेळाडू पद्मश्री डॉ. सुनील दबास, प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. संजय दुधे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉक्टर दीपक माने, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मोहन आर्भुळे, क्रीडा संचालक डॉ. अनिता लोखंडे आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विद्यापीठा तर्फे भव्य आयोजन करण्यात आले.

यामधे विविध खेळाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामधील ऐक स्पर्धा म्हणजे बेडमिंटन. एकूण बेडमिंटन स्पर्धेत २२ मुलींनचे तसेच २३ मुलांच्या संघानी भाग घेतला.

पहिल्या दिवशी बेडमिंटनचे ८ मुलांचे तसेच ८ मुलींनचे सामने झाले.

मुलीच्या गटात विशेतः डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई विरुद्ध महाराष्ट्र पशु मस्त्य विधन्यान विद्यापीठ, नागपूर या संघात सामना झाला. पहिल्या सेट मध्ये २१-१६, २१-२० दुसऱ्या सेट मध्ये ५-२१, ५-२१ तर तिसऱ्या सेट मध्ये ४-२१, ३-२१ अश्या स्कोर नी हा सामना अतिशय चुरशीचा झाला. या सामन्यात श्रेया वैंगणकर च्या उत्कृष्ट कामगिरी मुळे महाराष्ट्र पशु मस्त्य विध्यनानं विद्यापीठ, नागपूर नी जिंकला.

मुलांच्या गटात मुंबई विद्यापीठ, मुंबई विरुध्द डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या दोन संघात सामना झाला. पहिल्या सेट मधे २१-१६, २१-१९ दुसऱ्या सेट मधे २१-१७, १४-२१, १९-२१ तीसर्या सेट मध्ये २१-८, २१-६ चुरशीचा सामना रंगला. ह्या सामन्यात मुंबई विद्यापीठ, मुंबई नी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या संघाचा पराभव केला.रौप्य महोत्सवी आंतरविद्यापीठीय बॅडमिंटन स्पर्धेतील शिवजी विद्यापीठ, कोल्हापूर विरुद्ध स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ,नांदेड मधील सामना विशेष रंगला. त्यात शिवजी विद्यापीठाने बाजी मारली.

१६-२१,२१-१६,१३-२१ असातीन सेट मध्ये रंगलेला हा सामना शिवजी विद्यापीठाच्या ऋतुराज घोरपडेने आपल्या कौशल्यपूर्ण खेळाने गाजवला.

रवी भवन येथील विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात एकूण पाच क्रीडा प्रकारांत ही स्पर्धा होत असून बॅडमिंटन स्पर्धेचा आज पहिला दिवस होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे मास कम्युनिकेशन डिपार्टमेंटचे एच.ओ.डी मोहीज हक सर यांचे मार्गदर्शनात विद्यार्थी विद्यार्थिनी कार्यक्रमामध्ये मोलाचा सहभाग नोंदविला.

कातनेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेत 'आनंदनगरी' उत्साहात साजरी

परभणी ■ अरविंद कांबळे



पुर्णा तालुक्यातील कातनेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय जिवनासोबतच व्यवहारीक ज्ञान देखील मिळावे, म्हणून प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी विविध चविष्ट खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉल उभारले होते. दोन तासात विविध पदार्थाच्या विक्रीतून त्यांनी ११ हजार ५०० रुपयांची कमाई केली.

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातुन दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते याचा अनुभव यावा तसेच नफा तोटा या संकल्पना प्रत्यक्ष जीवनानुभवातून समजून घेता याव्यात या हेतूने शाळेत आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना कमवा शिका याची जाणीव होऊन त्यांच्यात अशी मूल्य रुजवण्यास मोठ्या प्रमाणात मदत होते.

मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी घरुनच साहित्य बनवून आणुन शालेय आवारात स्टॉल्स लावले. विद्यार्थी खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होते. या मेळाव्याला एकप्रकारे बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले होते.आनंदनगरीला गावातील पालकांनी, प्रतिष्ठित व्यक्तींनी,शिक्षणप्रेमींनी,युवकांनी व ग्रामस्थांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

निर्वीत बिबट्याची दहशत;पाळीव कुञ्यावर हल्ला? जॉनी नावाचा कुञा जागीच ठार

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



लहान पणापासुन कुटुंबातील सर्वांनीच 'जॉनी' नावाच्या पाळीव कुञ्यावर मनापासुन प्रेम करून जिव लावला परंन्तु त्याचा दुर्दैवी मुत्यू बिबट्याच्या हल्ल्यामध्ये होईल असे वाटले नव्हते अशी खंत निर्वी गावातील शहाणे कुटुंबियांनी व्यक्त केली आहे.

हि घटना काल दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी मध्यराञी निर्वी ते न्हावरा या मार्गावरील मा.ग्रा.पं सदस्य दिपकराव शहाणे यांच्या शेतातील वस्तीवर घडली.शहाणे कुटुंब हे राञी झोपेतच असताना मध्यराञी अचानक बिबट्या वस्तीवर आला व त्याने शहाणे कुटुंबाचा पाळीव कुञा जॉनीवर बेडर हल्ला चडवत त्याला चितपत करून जागीच ठार केले आहे.ही संपुर्ण घटना शहाणे कुटुंबियांना झोपेतुन उठल्यानंतर सकाळी लक्षात आली.आज बिबट्याने कुञ्यावर हल्ला केला तोच हल्ला माणसांवर केला तर ? माणसे देखील मरतील ?व ठार होतील ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.या घटने संदर्भात वनविभागाने वेळीच दखल घेणे गरजेचे असुन परिसरात पिंजरा लावण्याची मागणी निर्वी ग्रामस्थांच्या वतीने होत आहे.

या घटने संदर्भात निर्वी गावासह व परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले असुन राञी घराबाहेर निघावे का नाही ?असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.निर्वी ते न्हावरा या महामार्गावर दिवसभर नागरिकांची,शालेय विद्यार्थ्यांची दिवसभर रहदारी सुरू असते.त्यामुळे राञी बाहेर निघणारा बिबट्या हा दिवसाही बाहेर निघु शकतो असा सवाल नागरिक करत आहेत.याआधी बिबट्याने सोनवणे वस्ती परिसरातील शेळ्या,मेंढ्या,पाळीव कुञे,जनावरे आदि प्राण्यांवर हल्ला चढवत जखमी केले आहे.त्यामुळे नागिरकांत घबराटीचे वातावरण पसरले आहे.

वनविभागाने त्वरीत या परिसरात तातडीने पिंजरा लावुन बिबट्या जेरबंद करावा अशी मागणी श्रीपाद उद्योग व श्रीपाद ज्वेलर्सच्या संचालिका,विद्यमान ग्रामपंचायत सदस्या ,शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा भाग्यश्री बुऱ्हाडे,श्रीपाद ज्वेलर्सचे संचालक कमलेश बुऱ्हाडे,मा.ग्रा.पं.सदस्य दिपकराव शहाणे व ग्रामस्थांनी केली आहे.

पवार महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना विनम्र अभिवादन



परभणी ■ अरविंद कांबळे

पूर्णा (जं) प्रतिनिधी - येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ पी.डी सूर्यवंशी यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत कवडगांव शाळेत आरोग्यविषयक समुपदेशन

बीड ■ गितांजली लव्हाळे



सध्या राज्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम प्रभावीपणे राबवला जात आहे. राज्यातील सर्व शाळा यात उत्साहाने सहभागी झालेल्या असून याचाच एक भाग म्हणून वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगांव बुद्रुक मराठी येथे बदलत्या जीवनशैलीमुळे लहान वयातच येणाऱ्या लठ्ठपणा, मधुमेह, डोळ्यांचे विकार तसेच ?निमिया, व्यसनाधिनता याबाबत समुपदेशन करण्यात आले. याप्रसंगी मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, चिंचवण येथील समुपदेशक विशाल मुळे सर हे आवर्जून उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, सध्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत विविध उपक्रम शाळांमध्ये राबविले जात असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगांव ता.वडवणी येथे आरोग्य विषयक बाबींचे मार्गदर्शनपर शिबीराचे आयोजन काल दि.१२ जानेवारी २०२४ शुक्रवार रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी समुपदेशक विशाल मुळे सरांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळीबध्दल विविध समस्या व उपचार, लैंगिक समस्या शंका व समाधान, तसेच निराकरण, बदलत्या जीवनशैलीमुळे लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेह, डोळ्यांचे विकार , व्यसनाधिनता याबाबत मार्गदर्शन केले. तसेच किशोरवयीन मुलींना ?निमिया म्हणजे काय, याची लक्षणे कोणती, त्यावर काय पूर्व काळजी घ्यावी, अनेमिया होवू नये म्हणून काय काळजी घ्यावी याबाबत सविस्तर माहिती मुलींना दिली. तसेच व्यसनाधीनता म्हणजे काय व्यसनांचे प्रकार, व्यसनाचे तोटे व त्याचा आरोग्यावर होणारा दुष्परिणाम याबाबतही उपयुक्त अशी माहिती मुलांना देण्यात आली. सध्या स्मार्टफोन हे सुध्दा एक व्यसनच होत असून त्यापासूनही मुलांनी लांब राहिले पाहिजे असा उपयुक्त सल्ला त्यांनी मुलांना दिला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक कोल्हे सर, तसेच शाळेतील इतर शिक्षक ठोंबरे सर, बडे सर, वाघमारे सर, टकले सर उपस्थित होते. याप्रसंगी शाळेच्या वतीने विशाल मुळे सरांनी उपयुक्त माहिती मुलांना दिल्याबध्दल त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला. व कार्यक्रमाच्या शेवटी बडे सर यांनी मुळे सरांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.



बीड /गितांजली लव्हाळे.:- राष्ट्रमाता ,राजमाता माँ साहेब जिजाऊ यांची जयंती ,स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्सवात साजरी.. यावेळी अभिवादन करताना संभाजी ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष विजय दराडे सर , प्राध्यापक शेख सर, पत्रकार आप्पासाहेब साबळे, पत्रकार ज्ञानेश्वर कापसे सर , पत्रकार धनराज माने, पत्रकार गितांजली लव्हाळे. आदी दिसतं आहेत.

माजी विद्यार्थी संघटनेस प्रा बालाजी शिंदे यांच्या कडून ३२१०० रु भेट



परभणी ■ अरविंद कांबळे

आज दि. १२ जानेवारी २०२४ रोजी प्रा बालाजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी महाविद्यालयास ३२१०० रु माजी विद्यार्थी संघटनेस भेट म्हणून दिले यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष आदरणीय उत्तमरावजी दादा कदम, संस्थेचे सचिव श्री अमृतराज कदम, संस्थेचे सहसचिव प्रा. गोविंदरावजी कदम व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के राजकुमार, माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक प्रा. डॉ. राजीव यशवंते तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. दिनेश पवार, सचिव त्र्यंबक बोबडे, विष्णू कदम उपस्थित होते याप्रसंगी या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.गजानन कुरुंदकर , उपप्राचार्य डॉ .शिवसांब कापसे,तसेच डॉ. व्यंकट कदम ,उपप्राचार्य प्रा.आबाजी खराटेप्रा शेख एस.टी. , कार्यालयीन अधीक्षक बाळासाहेब कुलकर्णी, श्री.वसंतराव जी कदम यांची उपस्थित होते.

व्यसनमुक्त समाज काळाची गरज- पा दानियल शिंदे

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



जांबूत ताः शिरूर जांबूत येथे व्यसनमुक्ती, तणाव मुक्ती व आर्थिक सक्षमता या विषयांवर पवित्र शास्त्र आधारित प्रवचन आणि मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन कैवारी फाउंडेशन जांबुतच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी पा. दानियल शिंदे बोलत होते की व्यसनी व्यक्ती स्वतःच्या भावनांवर, विचारांवर नियंत्रण गमावून बसते.व्यक्तीला मुळात काही स्वभाव दोष, मानसिक विकार असतील तर ते उफाळून येतात. बोलण्यातली सुसंगती बिघडते. वागण्यातला तोल बिघडतो. अशी वागण्या बोलण्यातील ताळतंत्र गमावलेली व्यक्ती आपलं सामाजिक जीवन त्रासाचं करुन घेते. कुटुंबातील इतर सदस्यांना त्या वागण्याचा त्रास होतो. व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीला उपचारासाठी व्यसनमुक्ती केंद्रात आणणं बऱ्याच वेळा कठीण असतं. कारण चर्चेत लक्षात येतं की काही व्यक्तींना भीती असते की व्यसन केलं नाही तर आपल्याला झोप लागणार नाही, हातापायांचा थरकाप झाल्यामुळे काम होणार नाही, अस्वस्थ वाटेल, चिडचिड होईल, त्रास होईल म्हणून आपल्याला व्यसन सोडता येणं कठीण आहे, असं त्यांना वाटतं. मात्र व्यसनातून मुक्त होण्यासाठी इच्छाशक्तीची मोठी गरज असते.

व्यसन सोडताना जो त्रास व्यसनी व्यक्तीला होतो त्याला उपचारांनी ते कमी करता येतात आणि व्यसन सोडणं सोपं जातं, शक्य होतं. याची खात्री पटली की काही लोकं औषधांची, डॉक्टरांची मदत घ्यायला तयार होतात. अशा लोकांना औषधोपचार आणि समुपदेशन या दोन्हींच्या मदतीने चांगले उपचार करणं शक्य होतं. ज्या व्यसनी व्यक्ती डॉक्टरांकडे येण्यासाठी तयार नसतात त्यांच्यासाठी देखील वेगळे पर्याय सुचवले जातात. व्यवस्थित उपचारांनंतर काही लोक पूर्णपणे व्यसनमुक्त राहू शकतात. तर काही लोक पुन्हा वेगवेगळ्या कारणांमुळे पुन्हा पुन्हा व्यसनांकडे वळण्याची शक्यता असते. कारण फक्त मनाचा निश्चय करुन व्यसनमुक्त होणं सगळ्यांना जमत नाही. त्यासाठी विचारसरणीमध्ये आणि जीवनशैलीमध्ये बरेच बदल करावे लागतात. हे बदल घडायला वेळ लागतो आणि तोपर्यंत व्यसनमुक्त राहण्यासाठी अशा व्यक्तीला काही दिवस व्यसनमुक्ती केंद्रात उपचारांनी फायदा होऊ शकतो.

मुलींच्या बास्केट बॉल स्पर्धेत मुंबई विद्यापीठ ने मारली बाजी. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठा तर्फे आयोजित स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

रामटेक ■ जयश्री मेंघरे



नागपूर - माननीय राज्यपाल कार्यालयाच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले . अतिशय चुरशीच्या स्पर्धेत मुलींच्या बास्केट बॉल स्पर्धेत मुंबई विद्यापीठ ने गोंडवाना विद्यापीठाला ३० पॉइंटने हरविले व खेळाडूंनी बाजी मारली . यंदाचे रोप्य वर्षीय यजमानपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ भूषवित आहे नागपुरात १२ जानेवारीपासून या क्रीडा महोत्सवाला प्रारंभ झाला असून तिसऱ्यांदा नागपूर मध्ये ह्या स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात येत असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे मास कम्युनिकेशनचे एच.ओ.डी. मोईज हक सर यांनी दिली. दुरून दुरून विद्यापीठातून आलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये खेळाडूंचा उस्फूर्त सहभाग बघावयास मिळाला.

रौप्य क्रीडा महोत्सवाचे मान्यवरांच्या हस्ते थाटात उद्घाटन करण्यात आले.क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांची रुची असल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठा तर्फे भव्य आयोजन करण्यात आले आहे हे विशेष.महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव करिता नागपूर क्रीडा नगरी सज्ज झाली आहे. विद्यापीठा तर्फे रवी नगर स्थित क्रीडा परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक ट्रॅक सोबतच विविध मैदानावर ही स्पर्धा सुरू झाली आहे. होऊ घातलेल्या क्रीडा स्पर्धेत २३ विद्यापीठातील २ हजार तीनशे खेळाडूंचा सहभाग आहे . विद्यापीठातर्फे सर्व खेळाडू करता सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेले आहेत.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तर्फे पाच क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. उद्घाटनिय कार्यक्रमाला प्रामुख्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, कार्यक्रमाचे उद्घाटक सुवर्णपदक विजेता खेळाडू पद्मश्री डॉ. सुनील दबास, प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. संजय दुधे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉक्टर दीपक माने, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मोहन आर्भुळे, क्रीडा संचालक डॉ. अनिता लोखंडे आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती. १२ जानेवारीपासून सुरू झालेल्या क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यापीठातील मुला मुलींच्या ?थलेटिक्स, बास्केटबॉल, टेबल टेनिस ,हॉलीबॉल, बॅडमिंटन या पाच क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. वयक्तिक सोयीसुविधा कडे विद्या पीठाने विशेष लक्ष दिले. वैदकिय सुविधा तत्परतेने पुरविल्या हे विशेष.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासह राज्यातील तब्बल २३ विद्यापीठाच्या खेळाडूंच्या ह्या महोत्सवात सहभाग आहे हे विशेष. विद्यार्थी विद्यार्थिनी करता स्वतंत्र स्वच्छतागृहे फॉर्म ऑफ साठी नवीन परिसर विकसित केला आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रात देखील महत्वाचे स्थान असल्याचे खेळाडू विद्यार्थ्यांनी सांगून खेळाला जर प्राधान्य दिले तर क्रीडा क्षेत्रात प्रगती नक्कीच होते संदेश दिला.

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी, पूर्णाः श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय पूर्णा येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्याविषयी प्रा बालाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजमाता जिजाऊ यांनी त्या काळातील परिस्थितीवर आपल्या निर्णय क्षमतेने आणि मार्गदर्शनाने स्वराज्य घडवण्यासाठी शिवबाला तयार करण्याची जोखीम पत्करून स्वराज्य निर्माण करण्यास प्रेरित केल्याचे विशद केले तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याच्या माध्यमातून नव तरुणांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन त्यांनी केले याप्रसंगी संस्थेचे सहसचिव प्रा गोविंदराव कदम ,प्राचार्य डॉ के राजकुमार,उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे व डॉ गजानन कुरुंदकर, डॉ पी वाय गंगासागर, डॉ अजय कुर्हे,

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242